सोलापूर
तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. १९ जानेवारी २०२६ | वर्ष – ३२ | अंक २८३ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# महापौर आरक्षण सोडत लांबणीवर?

## महापौर निवडीचा सस्पेन्स कधीपर्यंत राहणार?

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १८ जानेवारी :** गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या महापालिका निवडणुका पार पडल्या आहेत. मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांचा निकाल १६ जानेवारीला जाहीर झाला आहे. महापालिका निकाल जाहीर होऊनही महापौर पदाचं आरक्षण जाहीर झालेलं नसल्यानं गोंधळाचं वातावरण कायम आहे. नियमित प्रक्रियेप्रमाणं निवडणूक जाहीर होण्यापूर्वी महापौर पदाचं आरक्षण जाहीर केलं जातं. यावेळी मात्र तसं झालं नसल्यानं गोंधळात वाढ झालीय. मुंबई महापालिका निवडणुकीत महायुतीला काठावरील बहुमत मिळालं आहे. महापालिका निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेनं त्यांचे नगरसेवक मुंबईतील त्यांच्या एका हॉटेलमध्ये ठेवले आहेत. महापौर पदाचं आरक्षण लांबल्यास नगरसेवकांचा हॉटेलमधील मुक्काम वाढण्याची शक्यता आहे.

महानगरपालिका निवडणुकांचे निकाल जाहीर होऊन ४८ तास होऊन गेले आहेत. मात्र, महापालिकांच्या महापौर पदाचं आरक्षण जाहीर झालेलं नाही. महापौर पदाची सोडत निवडणूक होण्यापूर्वी काढणं अपेक्षित होतं. नगरविकास विभागानं महापौर पदाची सोडत काढण्याची तयारी केली असल्याची माहिती आहे. नगरविकास विभागाला राज्य सरकारच्या आदेशाची प्रतीक्षा असल्याची माहिती सूत्रांकडून येत आहे. यामुळं महापौरपदाच्या आरक्षणाबाबत संभ्रम आणि गोंधळ कायम आहे.

महापौर पदाचं आरक्षण रखडल्यानं सोडत निघेपर्यंत नवनिर्वाचित सदस्यांना नगरसेवक म्हणून शपथ देखील घेता येत नसल्याची माहिती आहे. आरक्षण जाहीर झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती, मुख्य सभा बोलावणे आणि निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करणं



यासाठी १५ दिवसांचा वेळ लागतो. त्यामुळं जानेवारीच्या अखेरपर्यंत किंवा फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत महापौर निवडीचा सस्पेन्स कायम राहणार आहे.

महायुतीनं मुसंडी मारत मुंबई महापालिकेतील ठाकरेंच्या शिवसेनेला हादरा दिला. २५ वर्षांची मुंबई महापालिकेतील ठाकरेंची सत्ता घालवण्यात भाजपला यश आलं आहे. मुंबईच्या महापौरपदाचा प्रश्न महायुती कसा सोडवणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत महायुतीला ११८ जागांवर यश मिळालं आहे. मुंबई महापालिकेची सदस्यसंख्या २२७ असल्यानं बहुमताचा आखडा ११४ इतका आहे. भाजपनं ८९ जागांवर विजय मिळवला तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनं २९ जागांवर यश मिळवलं आहे. दुसरीकडे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं ६५ जागांवर विजय मिळवला. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं ६ जागांवर यश मिळवलं आहे. काँग्रेसला २४ जागांवर विजय मिळाला.

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनं त्यांचे नगरसेवक मुंबईतील हॉटेलमध्ये ठेवले आहेत. याबाबत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनं २९ पैकी २० नगरसेवक पहिल्यांदा निवडून आल्यानं त्यांच्या प्रशिक्षणासाठी त्यांना हॉटेलमध्ये ठेवल्याचं सांगण्यात आलं आहे.

### थोडक्यात...

#### नवनीत राणांची भाजपमधून हकालपट्टी होणार?

**अमरावती :** अमरावती महानगरपालिकेच्या निवडणुकीचा निकाल लागल्यापासून भाजपच्या माजी खासदार नवनीत राणा भाजप कार्यकर्त्यांच्या निशाण्यावर आहेत. भाजपच्या २२ उमेदवारांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र राणांविरोधात पत्र पाठवलं आहे. नवनीत राणा यांना पक्षविरोधी प्रचार केला,असा आरोप या उमेदवारांनी पत्राद्वारे केला आहे.राणांची पक्षातून हकालपट्टी करावी, अशी मागणीही या उमेदवारांनी फडणवीसांकडे केली आहे.या २२ उमेदवारांपैकी २ उमेदवार अमरावती महानगरपालिकेच्या निवंडणुकीत विजयी झाले आहेत. तर उर्वरित २० उमेदवारांचा पराभव झाला आहे.

#### पुण्याच्या महापौरपदासाठी तीन नावे चर्चेत

**पुणे :** पुणे महानगरपालिकेच्या १६५ जागांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान झाले. १६ जानेवारी रोजी पुणे महानगरपालिकेचा निकाल लागला. पुण्यामध्ये प्रमुख लढत ही भाजप आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये झाली होती. या निवडणुकीसाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्र येत जाहीरनामाही प्रसिद्ध केला होता. या जाहीरनाम्यामध्ये मोफत मेट्रो आणि बस प्रवासाचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र या आश्वासनानंतरही पुणेकरांनी राष्ट्रवादी काँग्रेसवर विश्वास दाखवला नाही हे निकालावरून स्पष्ट झाले आहे.

पुण्याच्या महापौरपदासाठी गणेश बिडकर, राजेंद्र शिळीमकर, धीरज घाटे ही तीन नावे चर्चेत असून या तीन पैकी एका उमेदवाराच्या गळ्यात महापौरपदाची माळ पडेल, असे बोलले जात आहे.

# महापालिका निकाल;काँग्रेसमध्ये खळबळ

## भाई जगताप यांना 'कारणे दाखवा', वर्षा गायकवाड राजीनामा देणार?

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १८ जानेवारी :** मुंबई महापालिकेमध्ये काँग्रेसची फारशी चमकदार कामगिरी न झाल्याने आता पक्षात टीका-टिप्पणी करण्यास सुरुवात झाली आहे. पक्षाचे माजी मुंबई अध्यक्ष आमदार भाई जगताप यांनी विद्यमान अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांचा राजीनामा मागितला आहे. गायकवाड यांच्या नेतृत्वात पक्षाची सर्वात दयनीय अवस्था झाल्याचे म्हणत त्यांनी हा राजीनामा मागितला आहे. तर, जगताप यांनी घेतलेल्या या जाहीर भूमिकेमुळे त्यांना पक्षाकडून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून त्यांना सात दिवसांत वक्तव्याविषयी कारणे दाखविण्यास सांगण्यात आले आहे.

मुंबई महापालिका निवडणुक काँग्रेसने स्वबळावर लढवण्याची घोषणा केली होती. मात्र, त्यानंतर वंचित बहुजन आघाडी आणि राष्ट्रीय समाज पक्ष या दोघांना लढाईत सोबत घेतले. पक्षाने १४३ जागा लढवून केवळ २४ जागांवरच यश मिळविता आले. २०१७मध्ये झालेल्या निवडणुकीत पक्षाने ३१ जागांवर विजय मिळवला होता. परंतु त्याहून पिछाडी झाल्याने पक्षात नाराजी आहे. निकाल लागून २४ तास उलटण्याआधीच पक्षाचे माजी मुंबई अध्यक्ष भाई जगताप यांनी वर्षा गायकवाड यांच्यावर सडकून टीका केली. तसेच त्यांनी नैतिकता दाखवत पराभवाची जबाबदारी स्वीकारावी, अशी मागणी केली.

# पुणे पाठोपाठ इंदापुरात धमाका!

## राष्ट्रवादीचा मोठा नेता भाजपच्या गळाला

**तभा वृत्तसेवा**

**पुणे , दि. १८ जानेवारी :** पुणे महानगरपालिकेत भारतीय जनता पक्षाने स्पष्ट बहुमत मिळवलं असून पुणे जिल्ह्यात दिवसेंदिवस भाजपची ताकद वाढत आहे. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत तब्बल १९ वर्ष राष्ट्रवादी काँग्रेस सोबत काम केलेले तत्कालीन जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर यांनी आज मुंबईत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

गारटकर सध्या अजित पवार गटात पक्षाचं काम पाहत होते. परंतु त्यांनी आता भाजपात प्रवेश केल्याने इंदापुरात भाजपची ताकद वाढली आहे. मुंबई येथील भाजप कार्यालयात प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण,ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे,इंदापूरचे भाजपा नेते प्रवीण माने,मयूर पाटील यांच्या उपस्थितीत गारटकर यांनी कार्यकर्त्यांसह भाजपात प्रवेश केला.याचवेळी गारटकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली.

अन्यायाविरोधात संघर्ष हेच ब्रीद घेऊन कायम लढत आलो असून आता दुसरी पिढी बरोबर घेऊन चालत आहोत.राष्ट्रसेवा करीत पक्षाचे विचार तळागाळात पोहोचवू आणि मुख्यमंत्र्यांसह सर्वच भाजपच्या वरिष्ठ नेत्यांना अभिमान वाटेल असं काम महाराष्ट्रात करून दाखवेल, असा विश्र्वास गारटकर यांनी व्यक्त केला आहे. प्रदीप गारटकर यांच्या प्रवेशाने इंदापूरसह जिल्ह्यात भाजपाची ताकद वाढली असून याचा फायदा राज्याच्या गतिमानतेला होईल.तुमच्या विश्वासाला भाजपात तडा जाऊ दिला जाणार नाही. असं आश्र्वासन यावेळी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी गारटकर यांच्यासह कार्यकर्त्यांना दिलं. पक्षवाढीसाठी आम्ही रक्ताचे पाणी करत मेहनत घेऊ. वरिष्ठांनी आमच्यावर असाच विश्र्वास दाखवावा.पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोचवल्याशिवाय आम्ही राहणार नाही. असं इंदापूरचे भाजपचे नेते प्रवीण माने यांनी म्हटलं आहे.






#### पुण्यातील दोन प्रमुख रस्ते आज दिवसभर बंद

**पुणे :** पुण्यासह पिंपरी चिंचवड शहरात 'पुणे ग्रँड चॅलेंज टूर' सायकल स्पर्धा पार पडणार आहे, या स्पर्धेच्या निमित्त सोमवारी (१९ जानेवारी) पुणे शहरातील प्रमुख रस्ते, तसेच उपरस्ते वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार आहेत. पुणेकरांसाठी महत्त्वाची बातमी असून सोमवार १९ जानेवारी रोजी शहरातील जंगली महाराज रस्ता आणि फर्ग्युसन महाविद्यालय रस्ता दिवसभर बंद राहणार आहे.

# लेफ्टनंट डॉ. राज ताडेराव लिखित समाजक्रांतीचे जनक : क्रांतिगुरु लहूजी साळवे (अक्षरयात्रा प्रकाशन, पुणे) ग्रंथाचा प्रकाशन



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १८ जानेवारी :** कणकवली महाविद्यालय, कणकवली येथे सुरू असलेल्या अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या उद्घाटन समारंभात लेफ्टनंट डॉ. राज ताडेराव लिखित समाजक्रांतीचे जनक : क्रांतिगुरु लहूजी साळवे (अक्षरयात्रा प्रकाशन, पुणे) या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला. हा सोहळा ऐतिहासिक, शैक्षणिक व सामाजिक दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण ठरला.

सदर कार्यक्रम अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेचे संस्थापक अध्यक्ष इतिहासाचार्य डॉ. जयसिंगराव पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यावेळी डॉ. राजश्री साळुंखे, डॉ. अशोक राणा, डॉ. सोमनाथ रोडे, डॉ. सतीश कदम, डॉ. बिंदा परांजपे, अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या अध्यक्षा डॉ. अरुणा मोरे, सचिव डॉ. सोपान जावळे, प्राचार्य डॉ. युवराज महालिंगे तसेच मुंबई विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. सोमनाथ कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

राज्यभरातून आलेल्या इतिहास संशोधक, अभ्यासक, इतिहासप्रेमी तसेच विद्यार्थ्यांच्या लक्षणीय उपस्थितीत हा सोहळा पार पडला. परिषदेमुळे मिळालेल्या व्यासपीठामुळे आणि कणकवली महाविद्यालयाने दिलेल्या सहकार्यामुळे आपल्या संशोधन कार्याला नवी दिशा, नवी ऊर्जा व आत्मविश्र्वास मिळाल्याचे लेफ्टनंट डॉ. राज ताडेराव यांनी सांगितले. उपस्थित मान्यवरांचा स्नेह, आशीर्वाद व सकारात्मक प्रतिसाद हीच आपल्या लेखनकार्याची खरी पावती असल्याचे त्यांनी नमूद केले.



CMYK

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## थंडी ओसरली ;उन्हाळ्याचे कासवगतीने आगमन

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, १८ जानेवारी :** मागच्या काही दिवसापासून लातूर शहर आणि परिसरात कडाक्याची थंडी बऱ्यापैकी ओसरल्याचे दृष्टीपथास येत आहे. थंडी ओसरल्याने कासवगतीने उन्हाळ्याचे आगमन होताना दिसत आहे.

यावर्षी लातूर जिल्ह्यात पावसाचे प्रमाण अतिशय समाधानकारक राहिले. अनेक भागात अतिवृष्टीही झाली. परिणामतः पाऊस थांबल्यानंतरही अनेक दिवस शेतकऱ्यांच्या शेतीतून पाण्याचा निचरा होऊ शकला नव्हता. अनेक शेतकऱ्यांना त्यामुळे रबीच्या पेरण्या वेळेत करणे शक्य झाले नव्हते. मागच्या काही दिवसात ढगाळ वातावरणामुळे थंडीचे प्रमाण अंशतः घटले होते. परंतु मागच्या तीन चार दिवसांपासून दिवस कडक उन्ह जाणवत आहे तर रात्रीच्या वेळेसही थंडी सुसह्य प्रमाणात जाणवत असल्याचे दिसून येत आहे.थंडीच्या वातावरणात अनेक घरातील पंख्याना विश्रांती मिळाली होती. परंतु या तीन चार दिवसात रात्रीच्या वेळेमध्ये पंख्यांचा वापर सुरु झाला आहे. तूर्तास उन्हाळ्याचे आगमन कासवगतीने होत आहे. एकंदर परिस्थिती पाहता ज्याप्रमाणे हिवाळ्यात कडाक्याची थंडी होती, त्याप्रमाणे उन्हाळाही मागच्या वर्षीच्या तुलनेत तीव्र राहण्याची शक्यता दिसून येत आहे. ज्येष्ठ जाणकारांच्या मते या महिन्याच्या अखेरपर्यंत थंडी पूर्णतः संपून जाईल आणि खऱ्या अर्थाने उन्हाळा सुरु होण्यासारखी स्थिती अनुभवता येणार आहे.



# सरकारकडून ओबीसी आरक्षणाचे लचके तोडले गेले : प्रकाश शेंडगे

**तभा वृत्तसेवा**
**लातूर १८ जानेवारी :** राज्य शासनाने विविध जीआरच्या माध्यमातून ओबीसी आरक्षणाचे लचके तोडण्याचे काम केले आहे, असा घणाघाती आरोप ओबीसी बहुजन आघाडी या राजकीय पक्षाचे अध्यक्ष माजी आमदार प्रकाश शेंडगे यांनी रविवारी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना केला. राज्यातील ओबीसी समाजाला राजकीय व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी आपण या आघाडीची स्थापना केल्याचे त्यांनी सांगितले.



एकंदर राजकीय परिस्थितीवरून राज्यात ओबीसी आरक्षणाचे वस्त्रहरण केले जात आहे. त्यातून मार्ग काढण्यासाठी सत्ता हस्तगत करणे हाच एकमेव प्रभावी मार्ग आहे,असे सांगून प्रकाश शेंडगे म्हणाले की, आजपर्यंत राजकीय पक्षांनी केवळ मतांपुरता ओबीसी समाजाचा वापर करून घेतला गेला आहे. नुकत्याच पार पडलेल्या राज्यातील महानगरपालिका निवडणुकांतही मराठा असणाऱ्या उमेदवारांनी ओबीसीसाठी आरक्षित असलेल्या जागांवर बोगस प्रमाणपत्राच्या आधारावर निवडणुका लढवल्या आहेत. त्यापैकी अनेकजण निवडूनही आले आहेत. त्यांना आपण जात प्रमाणपत्र पडताळणी समितीसमोर उघडे पाडणार आहोत. एखादेवेळी जात पडताळणी समितीने त्यांचे प्रमाणपत्र वैध ठरवले तरी त्याला न्यायालयात आव्हान देणार असल्याचे शेंडगे यांनी सांगितले.

मनपा निवडणुकीत राज्यात यावेळी कधी नव्हे एवढा पैशाचा महापूर आल्याचे पाहायला मिळाला, ही बाब अतिशय चुकीची आहे. निवडणूक लढाऊ इच्छिणाऱ्या ओबीसी कार्यकर्त्यांना एबी फॉर्मही मिळू दिले नाहीत. आमचे ओबीसीचे कार्यकर्ते पैशाने गरीब असले तरी त्यांच्यामागे आता संघटनेची फार मोठी असणार आहे. निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांना आता आपला पक्ष घरपोहोच एबी फॉर्म उपलब्ध करून देणार असल्याचेही त्यांनी सांगितले. आगामी जिल्हा परिषद - पंचाय समिती निवडणुकीत आपला पक्ष उतरणार असून ज्या ठिकाणी आपला पक्ष उतरणार नाही, त्या ठिकाणी मूळ ओबीसी असणाऱ्या उमेदवारांच्या पाठीशी राहणार आहे. सध्या निवडणूक आयोग उमेदवारांना प्रचारासाठी अधिक वेळ मिळू देत नाही, हा प्रकार कोणाच्या तरी दबावापोटी केला जात असल्याचा आरोप शेंडगे यांनी केला. राज्यातील सगळं ओबीसी समाज एकवटला तर त्याची टक्केवारी ८० टक्क्यांच्या घरात जाऊ शकते. हा समाज एकत्रित यावा,संघटित व्हावा यासाठीही आपण प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. ओबीसीच्या हक्कासाठी आता रणशिंग फुंकले आहे. आता सत्तेची प्राप्ती केल्याशिवाय थांबणार नाही, असेही प्रकाश शेंडगे यांनी ठणकावून सांगितले.

यावेळी ओबीसी बहुजन आघाडीचे महासचिव चंद्रकांत बावकर, खजिनदार जे.डी. तांडेल, राज्य संघटन सचिव पांडुरंग मिरगळ, लातूर जिल्हा प्रभारी लक्ष्मण दावणकर यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

# विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांचा सन्मान राखावा : कवी नारायण पुरी

### म.गांधी महाविद्यालय वार्षिक स्नेह संमेलनाचे शानदार उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, १८ जानेवारी :** येथील विचार विकास मंडळ संचलित महात्मा गांधी महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक १७ व १८ जानेवारी २०२६ असे दोन दिवसांत संपन्न होत असून, या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन सोहळा संस्थेचे अध्यक्ष अँड किशनराव बेंडकुळे यांच्या अध्यक्षतेखाली १७ जानेवारी रोजी संपन्न झाला. या स्नेहसंमेलनाचे उद्घाटक प्रसिद्ध हास्यकवी नारायण पुरी हे होते. उद्घाटनप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल आहे. त्यांनी आजच्या नवीन तंत्रज्ञानाचा फायदा घ्यावा. आपल्या आई-वडिलांचा सन्मान राखावा असे मत व्यक्त केले. तसेच, त्यांनी 'प्रेमाचा जांगडगुत्ता', देवेंद्राची सभा', 'काटा', 'ऐक सखे बाई' या कविता सादर केल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष अँड किशनराव बेंडकुळे यांनी स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांचे

हक्काचे व्यासपीठ असते. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी विविध कलांचे उत्तम सादरीकरण करावे आणि आपली वेगळी आपली ओळख निर्माण करावी असे सांगितले. पोलीस उपविभागीय अधिकारी अरविंद रायबोले व नगराध्यक्ष अँड स्वप्नील व्हत्ते यांनीही यथोचित मार्गदर्शन केले. याप्रसंगी कलामंचावर विचार विकास मंडळाचे सरचिटणीस अँड. पी. डी. कदम, उपाध्यक्ष अँड विजयकुमार देशमुख, उपाध्यक्ष मा. युवराज पाटील, सहसचिव मा. सुरेशराव देशमुख, सहसचिव अँड वसंतराव फड, कोषाध्यक्ष रामचंद्रराव शेळके, संचालकांमध्ये भागवतराव कदम, बापूसाहेब कदम, मधुकरराव देशमुख, व्यंकटराव मुंढे, गोविंदराव हिरवे, वसंतराव माने, प्रा हेमंत पाटील, सिनेट सदस्य डॉ. विनोद माने, उपप्राचार्य डॉ जे. पी. कुलकर्णी तसेच अँड बाळासाहेब बेंडकुळे, अँड विजय कोरे, उपसरपंच ज्ञानेश्र्वर शेळके, नंदकुमार कानवटे, पत्रकार उदय गुंडिले यांची उपस्थिती होती.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना कलागुणांच्या सादरीकरणासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी प्राध्यापक प्रो. डॉ आर. एम. कदम यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ बी. व्ही नरवाडे यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. यादव सूर्यवंशी व प्रा आर. डी. गुळवे यांनी केले आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ अनिल कांबळे यांनी मानले. महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

## आरोग्य व पर्यावरणासाठी कॉटन सॅनिटरी पॅड वापरणे आवश्यक : डॉ. अंजली जोशी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर १८ जानेवारी :** महिलांच्या आरोग्य तसेच पर्यावरणाच्या रक्षणासाठी मासिक पाळीच्या दरम्यान महिलांनी कॉटनचे सॅनिटरी पॅड वापरणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन उपप्राचार्या डॉ. अंजली जोशी यांनी केले. दयानंद शिक्षण संस्थाद्वारा संचालित दयानंद कला महाविद्यालयांतर्गत चालविण्यात येणाऱ्या तक्रार निवारण समितीच्या वतीने आणि प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनानुसार ' मासिक पाळीतील सॅनिटरी पॅड जनजागृती ' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी त्या बोलत होत्या. या कार्यशाळेत कर्करोग मुक्त भारत अभियान अंतर्गत सौ. मोनिका सौ. मोनिका सूर्यवंशी व सौ. स्मिता शिरोळे यांनी कॉटन सॅनिटरी पॅडचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यशाळेत बाजारात मिळणाऱ्या नामांकित कंपन्यांच्या सॅनिटरी



पॅड्स व कॉटन पॅड्स यांची तुलनात्मक प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. प्लास्टिकयुक्त पॅड्समुळे महिलांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. तसेच खाज, इन्फेक्शन व त्वचारोगासारख्या समस्या निर्माण होतात, असे यावेळी सांगण्यात आले.

# पीपल्स रिपब्लिकन पार्टीला मनपात स्वीकृत सदस्यपद देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर १८ जानेवारी :** महाराष्ट्रात लोकसभा ,विधानसभा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या पीपल्स रिपब्लिकन पार्टीने भाजप महायुतीला पाठींबा दिला आहे. त्यामुळे लातूर शहर महानगरपालिकेत पीपल्स रिपब्लिकन पार्टीला स्वीकृत सदस्यपद देण्यात यावे, अशी मागणी पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे लातूर जिल्हाध्यक्ष एन.डी. सोनकांबळे यांनी एका निवेदनाद्वारे भाजप शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्याकडे केली आहे.



पीपल्स रिपब्लिकन पार्टीने भाजप - महायुतीला राज्यात पार पडलेल्या निवडणुकात सर्वतोपरी सहकार्य केले आहे. या सर्व निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टी आणि पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या पाठींब्याने बहुसंख्य उमेदवारांनी भरघोस मते मिळवून दिल्याने जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणण्याकामी मोलाची भूमिका बजावली आहे. भाजपच्या या यशात पीपल्स रिपब्लिकन पार्टीचाही महत्वपूर्ण वाटा आहे. ही बाब लक्षात घेऊन लातूर शहर महानगरपालिकेत स्वीकृत नगरसेवक म्हणून पीपल्स रिपब्लिकन पार्टीला संधी द्यावी,अशी अपेक्षा निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. केवळ मनपातच नव्हे तर आगामी जिल्हा परिषद - पंचायत समितीच्या निवडणुकीतही ही युती कायम राहणार असल्याने या स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्वीकृत सदस्यपदी तसेच शासन स्तरावरील सर्व कमिटीमध्येही पीपल्स रिपब्लिकन पार्टीला सन्मानपूर्वक सामावून घेऊन योग्य ते प्रतिनिधित्व देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

या निवेदनाच्या प्रति मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे ,भाजप शहर जिल्हाध्यक्ष पाटील यांच्यासोबतच स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक प्रमुख माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. अभिमन्यू पवार, आ. रमेशआप्पा कराड यांनाही देण्यात आल्या आहेत.

# भारतीय किसान संघाच्या जिल्हाध्यक्षपदी तुकाराम येलाले तर मंत्रीपदी सतीश देशपांडे तावशीकर

**तभा वृत्तसेवा**
**लातूर १८ जानेवारी :** भारतीय किसान महासंघाची कार्यकारिणी जाहीर झाली असून लातूर येथील सूतमील रोडवरील माधवस्मृती संघ कार्यालयातील बैठकीत ही निवड करण्यात आली. यावेळी प्रांताध्यक्ष नवनाथ मदे यांनी लातूर जिल्हा किसान संघाच्या बैठकी संदर्भातील माहिती दिली व लातूर जिल्ह्याची कार्यकारिणी घोषीत केली. यावेळी जिल्हाध्यक्ष तुकाराम येलाले, मंत्री सतीश देशपांडे तावशीकर आदी उपस्थित होते.

येथील संघ कार्यालयात भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करून बैठकीला सुरूवात झाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संलग्न असलेली भारतीय किसान संघ ही शेतकर्यांच्या प्रश्नांवर काम करणारी संघटना असून या संघटनेच्या माध्यमातून शेतकर्यांच्या प्रश्नावर सातत्याने आवाज उठविण्याचे काम करण्यात येते. लातूर येथेही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यालयात जिल्ह्यातील भारतीय किसान संघाच्या शेतकर्यांची बैठक आयोजीत करण्यात आली होती. या बैठकीत खालील कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. जिल्हाध्यक्षपदी तुकाराम येलाले, उपाध्यक्ष म्हणून ज्ञानेश्वर हुरदळे, मंत्री सतीश यशवंतराव देशपांडे तावशीकर, कोषाध्यक्ष चंद्रशेखर मराठे, महिला प्रमुख श्रीमती शामाताई हुरदळे, स्वयंरोजगार प्रमुख व जैवीक कृषी प्रमुख जयवंत कुलकर्णी, जलआयाम प्रमुख श्रीकांत बेळंबे, पशुधन प्रमुख डॉ. शाम रेड्डी, प्रसिद्धी प्रमुख संजय देशपांडे आदिंची निवड करण्यात आली.

या बैठकीत जिल्हाध्यक्ष येलाले यांनी भारतीय किसान संघाच्या कार्य पद्धतीबाबत माहिती देऊन भारतीय किसान संघाचे काम




लातूर जिल्ह्यात चांगल्या रितीने व जिल्ह्यातील शेतकर्यांच्या हितासाठी करण्यात येत असल्याचे सांगून जिल्हा कार्यकारिणीसोबतच जिल्ह्यातील तालुका कार्यकारिणीही लवकरच जाहीर करण्यात येईल, असे सांगितले. किसान संघाच्या माध्यमातून जिल्ह्यातील विविध क्षेत्रात प्रगती केलेल्या शेतकर्यांशी संपर्क साधून शेतीचे उत्पादन कसे वाढेल, यासाठी प्रयत्न करणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. लातूर तालुक्यातील साई येथील प्रगतशील शेतकरी दगडूसाहेब पवार व निलंगा तालुक्यातील विवेकानंद वाडीकर यांनी शासनाच्या शेतकर्यांबाबत असलेल्या योजनांची माहिती सांगितली. यावेळी उपस्थित शेतकर्यांनी काही मौल्यवान सुचना केल्या तर अनेकांनी भारतीय किसान संघाच्या माध्यमातून शेतकर्यांसाठी काम करण्याचे आश्वासन दिले. पसायदानाने या बैठकीची सांगता झाली. बैठकीला जिल्हाभरातील मोठ्या प्रमाणावर शेतकरी उपस्थित होते.

# 'हिंद-दी-चादर' कार्यक्रम जनजागृती उपक्रमाच्या अंमलबजावणीचा लातूर विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी घेतला आढावा

### लातूर जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयांमध्ये मंगळावर, बुधवारी प्रभात फेरीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर १८ जानेवारी :** हिंद-दी-चादर गुरु श्री तेग बहादूर साहिबजी यांचा इतिहास सर्व विद्यार्थी व समाजातील नागरिकांपर्यंत पोहचावा, यासाठी शिक्षण विभागामार्फत विशेष उपक्रमाची जिल्ह्यात अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. दत्तात्रय मठपती यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक शनिवारी घेण्यात आली. सर्व आस्थापनांच्या शाळांनी या उपक्रमात सक्रीय सहभाग नोंदविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.



हिंद-दी-चादर गुरु श्री तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथील मैदानावर २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे भव्य कार्यक्रम राज्यस्तरीय समागम समिती व राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागामार्फत होत आहे. या अनुषंगाने शिक्षण विभागाने हाती घेतलेल्या जनजागृती कार्यक्रमाचा आढावा यावेळी घेण्यात आला. या बैठकीस शिक्षण सहाय्यक संचालक संजय पंचगल्ले, प्राथमिक शिक्षण विभागाचे नोडल अधिकारी संजय पारसेवार, माध्यमिक शिक्षण विभागाचे नोडल अधिकारी मधुकर ढमाले तसेच प्रशासन अधिकारी अशोक कदम व विभाग समन्वयक श्री माधव बाजगिरे हे उपस्थित होते. राज्य समन्वयक समितीने शिफारस केलेले श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवनावरील गीत सर्व २ हजार ६६६ शाळा व महाविद्यालयांमध्ये दररोजच्या परिपाठात गाण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. हे गीत सर्व विद्यार्थ्यांना व समाजातील नागरिकांना श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या बलिदानाची ओळख करून देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल, असे डॉ. मठपती म्हणाले.

याशिवाय, जनजागृती मोहीम अधिक प्रभावी करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व शाळांमधून मंगळवार व बुधवार या दोन दिवसांत रॅली काढण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या रॅलीद्वारे विद्यार्थी व शिक्षक श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या 'हिंद की चादर' या उपाधीचे महत्त्व व त्यांनी दिलेल्या बलिदानाची माहिती जनतेपर्यंत पोहोचवतील, असे डॉ. मठपती यांनी सांगितले. या बैठकीला सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांची ऑनलाइन उपस्थिती होती.

# अभाविपच्या मागणीला यश: छत्रपती शिवाजी राजे महाविद्यालय उदगीर येथे विद्यार्थी परिषदेचे आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर १८ जानेवारी :** उदगीर शहरातील छत्रपती शिवाजी राजे महाविद्यालयात १२ च्या विद्यार्थ्यांकडून परीक्षा प्रवेश पत्र (हॉल तिकीट) साठी अनावश्यक शुल्क आकारला जात असल्याच्याचे अखिल भारतीय विद्यार्थी परिषद उदगीर शाखेला विद्यार्थ्यांनी कळवले. याला अनुसरून अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने महाविद्यालयाच्या प्राचार्यांना निवेदन देऊन तसेच त्या विरोधात आंदोलन करून याचा तीव्र निषेध केला. महाविद्यालय प्रशासनाने संबंधित तक्रारीची दखल घेऊन आवश्यक शुल्क घेणे बंद केले. व विद्यार्थ्यांच्या कडून अवाजवी शुल्क घेणे तात्काळ थांबवले.



या आंदोलनात अभाविप शहर मंत्री सुमित लाल, तसेच महाविद्यालय शाखा सदस्य तसेच शहर कार्यकारणी सदस्य आणि अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवत अभाविपने विद्यार्थ्यांसह महाविद्यालयावर आक्रोश मोर्चा काढून प्रशासनाला जाब विचारला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .रामकिशन मांजरे यांनी प्रशासनाची चूक स्वीकारत संबंधित विद्यार्थ्यांचे शुल्क त्वरित माफ करत असल्याबाबत घोषणा केली.

यावेळी अभाविपचे शहर मंत्री सुमित लाल यांनी , ज्या-ज्या वेळी विद्यार्थ्यांवर अन्याय होतो, त्या प्रत्येक वेळी अभाविप विद्यार्थ्यांच्या हितासाठी ठामपणे उभी राहते आणि पुढेही उदगीर शहरातील शैक्षणिक व सामाजिक प्रश्नांवर विद्यार्थ्यांच्या वतीने आंदोलने करण्यात येतील. असे वक्तव्य केले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# थोडक्यात...

## राइड ईझी. वाइब ईझी. सादर आहे नवी चेतक सी २५

**छत्रपती संभाजी नगर :** बजाज ऑटो या जगातील सर्वात व्हॅल्यूएबल टू-व्हीलर आणिथ्री-व्हीलर कंपनीने आज ऑल-न्यू चेतक सी२५ लाँचकेल्याचे जाहीर केले. या निमित्ताने चेतकच्या पोर्टफोलिओमध्ये एक स्टायलिश, स्लीकआणि यूथफुल भर घालण्यात आली आहे. सुलभ प्रवासासाठी डिझाइन करण्यात आलेल्या चेतक सी२५च्या निमित्ताने चेतकची भक्कमता, टिकाऊपणा आणिविश्र्वासार्हता ही मूलभूत मूल्ये जशीच्या तशी कायम ठेवत ब्रँडला एक तरूण, कूल ओळखमिळाली आहे. या स्कूटरमुळे सुलभ व सहज राइडिंगचा अनुभव मिलतो. त्यामुळे रोजचाप्रवास सोपा आणि विनासायास होतो.

## अभिनेता रणबीर कपूर याची ब्रँड चेहरा म्हणून निवड

**नाशिक –** सुमारे ३० वर्षांहून अधिक कालावधीचा वारसा लाभलेल्या भारतातील सर्वात विश्र्वासार्ह ॲडहेसिव्ह (गोंद) ब्रँडपैकी एक असलेल्या ॲस्ट्रल लिमिटेडच्या बॉन्डटाइटने आपल्या नवीन ब्रँड मोहिमेच्या शुभारंभासह एक महत्त्वपूर्ण झेप घेतली आहे–भारतीय गोंद बाजारात दर्जेदार ब्रँड म्हणून आपले स्थान अधिक दृढ करण्याच्या दिशेने टाकलेले हे एक निर्णायक पाऊल आहे.या धोरणात्मक पावलाचा एक भाग म्हणून, बॉन्डटाइटने सुप्रसिद्ध अभिनेता रणबीर कपूर याची ब्रँड चेहरा म्हणून निवड केली आहे. विश्र्वासार्हता, अष्टपैलुत्व आणि पिढ्यानपिढ्या असलेले व्यापक आकर्षण यांसाठी ओळखला जाणारा रणबीर कपूर बॉन्डटाइटच्या ब्रँड मूल्यांशी सुसंगत असा चेहरा ठरतो आणि विश्र्वास व सापेक्षतेची ठोस भावना निर्माण करतो.

## रुकम कॅपिटल स्टडी – बियॉन्ड मेट्रोज


**पुणे :** भारतातील उपभोग-नेतृत्वाखालील वाढ आता मोठ्या महानगरांपुरती मर्यादित राहिलेली नाही. मागणी, उद्योजकता आणि दीर्घकालीन आर्थिक गती टियर २ आणि टियर ३ शहरे, उदयोन्मुख शहरे आणि लहान शहरांमध्येही वाढत आहे. सुरुवातीच्या टप्प्यातील ग्राहक ब्रँडना समर्थन देणारी व्हेंचर कॅपिटल फर्म रुकम कॅपिटलने त्यांचा नवीनतम संशोधन अहवाल बियॉन्ड मेट्रो: द रिअल स्टोरी ऑफ इंडियाज नेक्स्ट ५०० मिलियन प्रकाशित केला आहे, जो मेट्रो नसलेले ग्राहक ब्रँड कसे शोधतात, त्यावर विश्र्वास ठेवतात आणि खरेदी करतात हे उघड करतो.

## माहिती आयोगात दाखल प्रकरणांचा गतीने निपटारा; खंडपीठाची उल्लेखनीय कामगिरी

**छत्रपती संभाजी नगर :** राज्य माहिती आयोगाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने प्रकरणांच्या जलद निपटाऱ्यात उल्लेखनीय यश मिळवले आहे. सन २०२४ मध्ये खंडपीठाने १४ हजार १ द्वितीय अपिले निकाली काढली असून, २०२५ मध्ये १० हजार ७८३ द्वितीय अपिलांचा यशस्वी निपटारा करण्यात आला आहे.आयोगाकडे प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या निपटाऱ्याच्या प्रमाणात जवळपास दहापटीने वाढ झाली असून, द्वितीय अपिलांच्या प्रलंबिततेत सुमारे ५५ टक्क्यांची लक्षणीय घट झाली आहे.राज्य माहिती आयुक्त प्रकाश इंदलकर यांच्या प्रभावी प्रशासकीय नियोजनामुळे आणि सातत्यपूर्ण कार्यपद्धतीमुळे ही कामगिरी शक्य झाली आहे. तक्रार निवारणात २०२५ मध्ये १० टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली आहे.

# ज्येष्ठ भारतीय संगीतकार पद्मविभूषण इलयाराजा यांना यंदाचा पद्मपाणि पुरस्कार जाहीर

## अकराव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मान्यवरांच्या हस्ते होणार प्रदान



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १८ जानेवारी :** जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठवाड्यातील रसिकांपर्यंत पोहोचवणार्या अकराव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची घोषणा करण्यात आलेली असून बुधवार, दि. २८ जानेवारी ते रविवार, दि. ०१ फेब्रुवारी २०२६ या दरम्यान हा महोत्सव छत्रपती संभाजीनगर येथे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील कलावंताच्या मांदियाळीत संपन्न होणार आहे. या महोत्सवात भारतीय सिनेसृष्टीतील अतुलनीय योगदानाबद्दल दिला जाणारा पद्मपाणि पुरस्कार चित्रपट संगीताला नवी दिशा देणारे ज्येष्ठ भारतीय संगीतकार, पद्मविभूषण श्री. इलयाराजा (राज्यसभा सदस्य) यांना जाहीर करण्यात आला आहे. याबाबतची घोषणा महोत्सवाचे संस्थापक व संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, प्रमुख मार्गदर्शक अंकुशराव कदम व महोत्सवाचे मानद अध्यक्ष आशुतोष गोवारीकर यांनी केली आहे. पद्मपाणि पुरस्कार निवड समितीने श्री. इलयाराजा यांची निवड केली असून या समितीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ समीक्षक लतिका पाडगांवकर तर सदस्यपदी चित्रपट दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर, सुनील सुकथनकर व चंद्रकांत कुलकर्णी यांचा समावेश होता. पुरस्काराचे स्वरूप पद्मपाणि सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व दोन लक्ष रूपये असे आहे.

पद्मपाणि पुरस्कार प्रदान सोहळा मान्यवरांच्या हस्ते महोत्सव उद्घाटन कार्यक्रमात बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५:३० वाजता रुक्मिणी सभागृह, एमजीएम परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. तर महोत्सव पुढील पाच दिवस आयनॉक्स, प्रोझोन मॉल येथे संपन्न होणार आहे.

गेल्या पाच दशकांहून अधिक काळ इलयाराजा यांनी भारतीय चित्रपटसंगीतात सातत्यपूर्ण आणि सर्जनशील योगदान दिले आहे. आतापर्यंत त्यांनी ७,००० हून अधिक गाणी तसेच १,५०० पेक्षा अधिक चित्रपटांसाठी संगीत निर्मिती केली आहे. तामिळ, तेलुगू, मल्याळम, कन्नड, हिंदी, मराठी आदी विविध भारतीय भाषांमधील त्यांच्या संगीतरचनांनी रसिकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले आहे. कर्नाटकी संगीत, हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत व लोकसंगीताच्या बाजावर आधारलेले, तसेच पाश्र्चात्त्य सिम्फनीची शिस्त लाभलेले संगीत ही त्यांची प्रमुख ओळख आहे. चित्रपटातील प्रसंगांना भावनिक खोली देणारे पार्श्र्वसंगीत आणि कथानकाला पूरक ठरणारी संगीतरचना हि इलयाराजा यांची प्रमुख ओळख आहे. कला, करुणा आणि सर्जनशील साधनेचे प्रतीक मानल्या जाणार्या पद्मपाणि पुरस्कारासाठी इलयाराजा यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या संगीतातील आध्यात्मिकता, शिस्त आणि मानवी संवेदनशीलतेमुळे ते जनमानसात 'इसैज्ञानी' (संगीतक्षेत्रातील ऋषीतुल्य व्यक्तिमत्व) म्हणून ओळखले जातात.

नाथ ग्रुप, एमजीएम विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण सेंटर प्रस्तुत व मराठवाडा आर्ट कल्चर व फिल्म फाउंडेशन आयोजित अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हा केंद्रीय सूचना व प्रसारण मंत्रालय भारत सरकार, सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने संपन्न होत असून प्रोझोन मॉल यांचे विशेष सहकार्य या फेस्टिव्हलला मिळालेले आहे. एनएफडीसी व महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन यांची सहप्रस्तुती असणार आहे. सॉलीटेअर टॉवर्स, कालिका स्टील, डेली हंट हे या महोत्सवाचे सह आयोजक आहेत.

मराठवाड्याचे नाव चित्रपट क्षेत्रात जागतिक व्यासपीठावर नेणार्या या महोत्सवात देशभरातील नागरीकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, प्रमुख मार्गदर्शक अंकुशराव कदम, मानद अध्यक्ष आशुतोष गोवारीकर, सतीश कागलीवाल, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, महोत्सवाचे संचालक सुनील सुकथनकर, कार्यकारी संचालक चंद्रकांत कुलकर्णी, महोत्सवाचे संयोजक नीलेश राऊत, सहसंचालक जयप्रद देसाई व ज्ञानेश झोटींग, डॉ. अपर्णा कक्कड, श्र्वेता कागलीवाल, डॉ.आशिष गाडेकर, कला संचालक डॉ.शिव कदम, डॉ.रेखा शेळके, डॉ.प्रेरणा दळवी, शिव फाळके, प्रा. दासू वैद्य, डॉ. आनंद निकाळजे, सुबोध जाधव, अमित पाटील, निखील भालेराव आदींनी केले आहे.

## उबाठाचे उप जिल्हाप्रमुख दत्ता गोर्डे भाजपाच्या वाटेवर



**तभा वृत्तसेवा**

**पैठण दि १८ जानेवारी :** पैठणच्या राजकीय क्षेत्रात कमस्वरूपी चर्चेत असलेले उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख दत्ता गोर्डे हे पुन्हा भारतीय जनता पार्टी पक्षात प्रवेश करणार असून या याप्रवेशाने नगर परिषद निवडणूकित बॅकफूटवर पडलेल्या भाजपाला नवसंजीवणी मिळणार आहे.तसेच लागलीच पार पडणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूकित भाजपाचा फायदा होणार असल्याचे बोलले जात आहे.

विधानसभेच्या निवडणूकित दुसऱ्यांदा कडवी झुंज देणारे दत्ता गोर्डे यांना पैठण नगर परिषद निवडणूकित ही पराभवाचा सामना करावा लागला. त्यांच्या पत्नी अपर्णा गोर्डे यांनी नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवली होती. त्यांना क्रमांक दोनचे मतदान मिळाले. स्व- पक्षाने मदत न केल्याने त्यांचा पराभव झाल्याचे अनेकांचे सांगणे आहे. दुसरीकडे मागील काळात पैठण नगर परिषदेवर थेट जनतेतून भाजपचे नगराध्यक्ष सुरज लोळगे हे निवडून आले होते. यंदाच्या न. प. निवडणूकित थेट जनतेतून पुन्हा भाजपाचा नगराध्यक्ष होईल असा कयास बांधला असता लोळगे यांच्यामुळे या निवडणुकीत भाजपाचा दारुण पराभव झाल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.स्वतः,पत्नी, कामगार, आणि नातेवाईक यांना तिकीट तर ईतर काही उमेदवारांना चुकीचा बी फार्म दिल्या प्रकरणाचा मुद्दा निवडणूकित चांगला गाजला.याप्रकरणी पक्ष निरीक्षक असलेले कॅबिनेट मंत्री अतुल सावे, आमदार अनुराधा चव्हाण, स्थानिक पक्ष निरीक्षक तुषार शिसोदे, लक्ष्मण औटे यांना ही पक्षाने जाब विचारला असल्याचे बोलले जात आहे. पैठण शहरात हुकूमशाही करत भाजपाला पराभव देणारे लोळगे यांचे नेतृत्व बदलाची चिन्हे असतांना आता गोर्डे यांचा भाजपा पक्ष प्रवेश निर्णायक ठरणार आहे.

तालुक्यातील जिल्हा परिषद ९, पंचायत समितीच्या १८ जाग्यांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरु आहे. अश्यात दत्ता गोर्डे यांच्या पक्ष प्रवेशावर ईतर राजकीय पक्षांची नजर राहणार आहे. गोर्डे यांच्या सोबत तालुक्यातील तसेच शहरातील अनेक दिग्गच मंडळी भाजपात प्रवेश करणार असल्याची माहिती दत्ता गोर्डे यांनी दिली. भाजपाच्या छत्रपती संभाजीनगर विभागीय पक्ष कार्यालयावर त्यांचा पक्ष प्रवेश होणार आहे.

## पुष्पाबाई मुथा यांचे निधन



**लासुरस्टेशन :** लासुरस्टेशन येथील जेष्ठ महिला पुष्पाबाई सजनराजजी मुथा वय ८५ यांचे रविवारी सकाळी जोधपूर येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले ४ मुली सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. वैजापूर मर्चंट बँकेचे संचालक तथा उद्योजक प्रीतमकुमार मुथा यांच्या त्या आजी होत्या. सोमवार दि.१९ रोजी दुपारी तीन वाजता लासुरस्टेशन येथील जैन स्थानक येथे त्यांचा उठावना कार्यक्रम होणार आहे.

## कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये देशसेवेत कार्यरत जवानांसाठी आरोग्य सुविधा



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १८ जानेवारी :** देशसेवेत कार्यरत असलेल्या सशस्त्र दलांच्या जवानांसाठी दर्जेदार व वेळेवर आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने एमएमआरआय अंतर्गत कार्यरत असलेल्या कमलनयन बजाज हॉस्पिटलने मिलिटरी हॉस्पिटलसोबत महत्त्वपूर्ण आरोग्यविषयक सामंजस्य करार केला आहे. या भागीदारीमुळे जवान आणि त्यांच्या अधिकृत कुटुंबीयांसाठी वैद्यकीय सुविधा अधिक सुलभ आणि प्रभावी ठरणार आहेत.

या सामंजस्य करारावर कमलनयन बजाज हॉस्पिटलकडून मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) डॉ. जॉर्ज फर्नांडीस, तर मिलिटरी हॉस्पिटलकडून कमांडिंग ऑफिसर कर्नल शरद भल्ला यांनी स्वाक्षरी केली. देशाच्या सुरक्षेसाठी अविरत कार्य करणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञतेची भावना आणि सामाजिक जबाबदारीतून ही आरोग्यविषयक पुढाकार घेण्यात आला आहे.या कराराअंतर्गत सशस्त्र दलातील जवानांना तसेच त्यांच्या कुटुंबीयांना आपत्कालीन परिस्थितीत कमलनयन बजाज हॉस्पिटलमधील इमर्जन्सी, सब-स्पेशालिटी आणि सुपर स्पेशालिटी वैद्यकीय सेवांचा कोणत्याही अडथळ्याशिवाय लाभ मिळणार आहे. आधुनिक वैद्यकीय सुविधा, अनुभवी तज्ज्ञ डॉक्टरांची टीम आणि संवेदनशील सेवा व्यवस्थेमुळे उपचार अधिक परिणामकारक ठरणार आहेत.

आरोग्यसेवा ही केवळ सेवा नसून ती एक सामाजिक आणि राष्ट्रीय जबाबदारी असल्याचे अधोरेखित करत, कमलनयन बजाज हॉस्पिटलने भविष्यातही देशसेवेत कार्यरत जवानांच्या आरोग्यासाठी अशा उपक्रमांद्वारे योगदान देत राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

## इंद्रराज महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रम संस्कार शिबिर समारोप सोहळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**

**सिल्लोड, दि. १८ जानेवारी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व इंद्रराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिल्लोड राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमान आयोजित सात दिवशी विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप सोहळा वरूड ह्या गावी दि. १६ जानेवारी २०२६ रोजी संपन्न झाला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. जी. जी. राजपूत अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. दीपक गवई उपस्थित होते. विशेष उपस्थितीत महाविद्यालयाचे उपप्रचार डॉ. व्ही. बी.लांब तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ.सी.एम काळे , गावचे सरपंच श्री दीपक कळम, उपसरपंच श्री गुलाब मिरगे तसेच महाविद्यालयाचे स्टाफ सेक्रेटरी डॉ.जे.एस. अंभोरे व आयक्यूएसी. समन्वयक प्रा. डॉ. एस. एस. चौथाइवाले उपस्थित होते. दिनांक १० ते १६ जानेवारी २०२६ दरम्यान झालेल्या शिबिराच्या समारोपाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. आर. एम. बिरादार यांनी केले. शिबिराचे सात दिवसाचे अहवाल वाचन कार्यक्रमाधिकारी डॉ. के. आर. नगरे सरांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत सुद्धा व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. विनोद शेळके यांनी केले. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष मा.खा. श्री उत्तमसिंह पवार महाविद्यालयाचे सचिव मा. श्री अशोक देवरे व राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. सोमीनाथ खाडे यांनी या कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. शिबिरास इंद्रराज महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व वरूड गावातील सर्व ग्रामपंचायत सदस्य व प्रतिष्ठित नागरिक तसेच रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. प्रीतम मुळे, प्रा. डॉ.जे जे पाटील, प्रा. डॉ. सविता म्हस्के यांनी सहकार्य केले. दिनांक १६जानेवारी रोजी श्रमसंस्कार शिबिराचा समारोप सोहळा उत्कृष्टपणे पार पडला.

## एमजीएममध्ये भाभा अणु संशोधन केंद्राच्या शास्त्रज्ञांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद



**तभा वृत्तसेवा,**

**छत्रपती संभाजीनगर, दि.१८ जानेवारी:** महत्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट डिपार्टमेंटच्या वतीने आज भाभा अणु संशोधन केंद्र (बार्क) येथील शास्त्रज्ञांसमवेत आर्यभट्ट सभागृहात विद्यार्थी संवादाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात शास्त्रज्ञ डॉ.बी. एस.धाबेकर, शास्त्रज्ञ डॉ. कमल शर्मा आणि शास्त्रज्ञ डॉ. बबिता तिवारी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत मार्गदर्शन केले.

या संवाद सत्रास एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या प्रमुख डॉ.परमिंदर कौर, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते.

संवाद सत्रात शास्त्रज्ञ डॉ. बी. एस. धाबेकर यांनी 'फॅसिनेटिंग हिस्टरी ऑफ डिपार्टमेंट ऑफ ॲटोमिक एनर्जी' या विषयावर सविस्तर माहिती दिली. शास्त्रज्ञ डॉ. कमल शर्मा यांनी 'करिअर ऑपॉर्च्युनिटीज इन डिपार्टमेंट ऑफ ॲटोमिक एनर्जी' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, तर शास्त्रज्ञ डॉ.बबिता तिवारी यांनी 'होमी भाभा नॅशनल इन्स्टिट्यूट' या विषयावर संवाद साधला.

अध्यक्षीय समारोप करताना कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ म्हणाले, आज विद्यार्थ्यांसाठी विविध क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध आहेत. कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी सातत्याने ज्ञानार्जन करणे आवश्यक आहे. एमजीएम विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. भाभा अणु संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञांचे विद्यापीठात आगमन हे विद्यार्थ्यांसाठी मोठी संधी असून विद्यापीठात सात विद्याशाखांच्या माध्यमातून शिक्षण दिले जात असल्याचे कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या प्रमुख डॉ. परमिंदर कौर यांनी केले तर सूत्रसंचालन सिमरन कौर यांनी केले.

## 'शतक'च्या माध्यमातून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ समाजापर्यंत पोहोचेल – डॉ. मनमोहनजी वैद्य



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १८ जानेवारी :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (RSS)शताब्दी वर्षानिमित्त तयार करण्यात आलेला 'शतक : संघ के १०० वर्ष' हा चित्रपट येत्या १९ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित होत असून, या चित्रपटाच्या ट्रेलरचे मुंबईत भव्य समारंभात अनावरण करण्यात आले. हा ट्रेलर संघाचे अखिल भारतीय कार्यकारी मंडळ सदस्य व ज्येष्ठ पदाधिकारी डॉ. मनमोहन वैद्य यांच्या हस्ते, अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत सादर करण्यात आला.

ट्रेलर लाँचपूर्वी निवडक माध्यम प्रतिनिधींसाठी विशेष प्रिव्ह्यूचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष प्रदर्शनामुळे पत्रकारांना चित्रपटाचा आशय, दृष्टीकोन आणि निर्मितीमागील संशोधन प्रक्रिया अधिक सखोलपणे समजून घेण्याची संधी मिळाली. २०२५ हे वर्ष संघासाठी ऐतिहासिक ठरले असून, संघाच्या शंभर वर्षांच्या प्रवासाचा सिनेमॅटिक वेध 'शतक' या चित्रपटातून घेण्यात आला आहे.

ट्रेलरमध्ये संघाची स्थापना १९२५ मध्ये डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी कशी केली, तसेच गुरुजी (एम. एस. गोळवलकर) यांच्या नेतृत्वाखाली संघाची संघटनात्मक घडण, विस्तार आणि वैचारिक अधिष्ठान कसे दृढ झाले, याचे प्रभावी चित्रण करण्यात आले आहे. संघाची शिस्त, मूल्याधिष्ठित कार्यपद्धती आणि दीर्घकालीन दृष्टी यांचा प्रवास संघाच्या स्वतःच्या दृष्टिकोनातून मांडण्याचा प्रयत्न चित्रपटात करण्यात आला आहे.

या चित्रपटाद्वारे संघासंदर्भात दीर्घकाळ प्रचलित असलेल्या गैरसमजांवर प्रकाश टाकण्यात आला असून, स्वातंत्र्यलढा, संघावरील बंदी, आणीबाणीचा काळ यांसारख्या संवेदनशील टप्प्यांचा समतोल व संदर्भासहित आढावा घेण्यात आला आहे. त्यामुळे प्रेक्षकांना संघाच्या इतिहासाकडे अधिक व्यापक आणि वस्तुनिष्ठ दृष्टीने पाहण्याची संधी मिळणार आहे.

यावेळी डॉ. मनमोहन वैद्य म्हणाले, 'शतक'च्या माध्यमातून संघाची कथा समाजापर्यंत पोहोचणार आहे. चित्रपट हे प्रभावी माध्यम असून, त्यातून मोठ्या प्रमाणावर लोकांपर्यंत संवाद साधता येतो. त्यामुळे संघाच्या विचारांची आणि कार्याची ओळख नव्या पिढीपर्यंत पोहोचण्यास मदत होईल.

विर कपूर निर्मित, आशिष मल्ल दिग्दर्शित व आशिष तिवारी सहनिर्मित 'शतक' हा चित्रपट इतिहास, विचार आणि वर्तमान यांचा समन्वय साधत संघाच्या शतकी वाटचालीकडे नव्या दृष्टीने पाहण्याचे आमंत्रण देतो. भव्य दृश्यरचना, प्रभावी निवेदन आणि आशयसंपन्न मांडणीच्या जोरावर हा चित्रपट प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण करत आहे.

# तेजस्वी इतिहासाचे अस्वस्थ वर्तमान

रोखठोक

दिनेश गुणे



कोणत्याही राजकीय पक्षाच्या सत्ताकारणातील वाटचालीचा धांडोळा घेताना, त्याच्या इतिहासाची उजळणी अपरिहार्य असते. इतिहासातून त्या पक्षाने कोणता धडा घेतला, वर्तमानकाळापर्यंतच्या वाटचालीत त्यामधून कोणता शहाणपणा प्राप्त केला आणि वर्तमानाच्या स्थितीचा आढावा घेत भविष्याची कोणती नीती निश्चित केली, यावर त्या राजकीय पक्षाच्या अस्तित्वापासून भविष्यापर्यंतची स्थिती ठरविली जाते. या परिणामांचे मोजमाप करून ढोबळ मानाने काही प्रमुख राजकीय पक्षांच्या वाटचालीकडे पाहिल्यास, इतिहास आणि वर्तमानाच्या स्थितीमध्येच मोठी विसंगती दिसू लागते. ज्या पक्षांचा इतिहास उजळलेला दिसतो, त्यांच्या वर्तमानावरच अस्वस्थतेची, अस्थिरतेची काजळी दिसू लागते आणि भविष्याच्या अनिश्चिततेचे सावटदेखील दिसू लागते. याउलट, ज्या पक्षांच्या इतिहासावर अनिश्चिततेचे, पराजयाचे सावट होते, त्यांनी वर्तमानाच्या वाटचालीची नियोजनबद्ध आखणी केली, ध्येय निश्चित केले, त्यानुसार रचना आणि रणनीती बदलत नव्या बदलांचा स्वीकार करणाऱ्या ध्येयनिष्ठ मनांची योग्य मशागतही केली आणि भविष्याच्या वाटचालीस नव्या दमाने सुरुवात करून वर्तमानातील यशाचा टप्पा पार केला असेही दिसते. त्यामुळे अशा पक्षांचे भविष्यही उजळलेले राहणार, याविषयी सध्या तरी कोणालाच कोणतीही शंका राहिलेली नाही.

महाराष्ट्रातील राजकारण आणि सत्ताकारणाच्या वर्तमानाकडे पाहताना, येथील राजकारणावर प्रभाव टाकणाऱ्या काही पक्षांच्या इतिहासाचे बोट धरून वर्तमानाच्या वाटचालीचा मागोवा घ्यावा लागेल. ज्या पक्षांनी इतिहासात यशाचे झेंडे रोवले, जनाधाराची आणि जनतेच्या विश्वासाची मोठी पुंजी गाठीशी बांधली आणि त्याच्या जोरावर वर्तमानात वाटचाल करतानाही काही नीती बदलल्यामुळे बदललेल्या स्थितीशी संघर्ष करण्याची वेळ ओढवली, त्यात बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या शिवसेनेचा आणि शतकाहूनही अधिक काळाची लोकमान्यतेची परंपरा लाभलेल्या काँग्रेसचा समावेश करावा लागतो.

रविवार, १९ जून १९६६. हा दिवस महाराष्ट्राच्या राजकारणाला नवी दिशा देणारा ठरला. म्हणजे, त्या दिवशी एका इतिहासाची भविष्याच्या दिशेने दमदार वाटचाल सुरू झाली. मराठी माणसाच्या न्याय्य हक्कासाठी लढणारी संघटना म्हणून शिवसेनेची स्थापना झाली. त्या दिवशी सकाळी सव्वानऊ वाजता शिवछत्रपतींच्या जयजयकारात शिवसेनेची सदस्य नोंदणी सुरू झाली. सहदेव नाईक नावाचा बाळासाहेबांचा निष्ठावंत पाईक पुढे आला, त्याने स्थापनेच्या मुहूर्ताचा नारळ फोडला आणि प्रबोधनकार ठाकरे यांच्या हस्ते शिवसेनेच्या सदस्य नोंदणीचे फॉर्म वाटप सुरू झाले. दोन दिवसांत सोमवारी संध्याकाळपर्यंत १० हजार मराठी माणसांनी शिवसेनेचे सदस्यत्व घेतले. सदस्य नोंदणीच्या त्याच तक्त्यावर, डरकाळ्या फोडणाऱ्या ढाण्या वाघाचे चित्र, शिवसेनेचे बोधचिन्ह आणि छत्रपती शिवरायांचे चित्र होते. 'मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा' हे वचन त्यावर लिहिले होते. शिवसेनेच्या स्थापना दिवसाचा हा इतिहास अजूनही काही बुजुर्ग शिवसैनिकांच्या नजरेसमोर जसाच्या तसा तरळताना दिसतो. त्याच दिवशी संघटनेचे नावही निश्चित झाले आणि मुंबईतील मरोळ येथील 'बोरोसिल ग्लास वर्क्स' नावाच्या कंपनीत 'मराठी माणसाचा खिमा' या मथळ्याखाली मराठी माणसावरील अन्यायास वाचा फोडणारे वृत्त 'मार्मिक'मध्ये प्रसिद्ध झाले. मराठी माणसाच्या हक्कासाठी लढणाऱ्या या संघटनेत सामील होणाऱ्या मराठी माणसास आपल्या कर्तव्याची दिशा स्पष्ट असावी, या हेतूने बाळासाहेब ठाकरे यांनी सदस्यांकडून प्रतिज्ञापत्रे भरून घेण्याचे ठरविले. त्यासाठी संघटनेचे १२ कलमी धोरणपत्रही निश्चित झाले. शिवसेनेच्या स्थापनेपासून सुरू झालेला हा इतिहास पुढची अनेक दशके आक्रमकतेचा, न्यायाच्या संघर्षाचा ठरल्याने मराठी माणसाच्या मनामनाचा या संघटनेने ठाव घेतला होता. १९६८ मध्ये मुंबई महापालिकेत प्रवेश आणि १९७० मध्ये थेट विधानसभेत दाखल झालेल्या शिवसेनेने महाराष्ट्र काबीज करणारा झंझावात बाळासाहेबांच्या नेतृत्वात सुरू केला आणि २००२ पर्यंत बाळासाहेब ठाकरे यांच्या पंच्याहत्तरीपर्यंत या तेजस्वी इतिहासाची नवनवी पाने तयार होत राहिली. १९९५ ते १९९९ हा काळ शिवसेनेच्या इतिहासातील सुवर्णकाळ ठरला.

(या काळाचा उल्लेख शिवसेनेच्या इतिहासात 'शिवशाही' असा केला जातो.) १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना-भाजपा युतीला राज्यातील २८८ जागांपैकी १३४ जागांवर विजय मिळाला आणि मंत्रालयावर भगवा फडकावण्याचे आपले स्वप्न साकार झाले, अशा शब्दांत बाळासाहेबांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. १४ मार्च १९९५ या दिवशी शिवाजी पार्क मैदानावरील शाही सोहळ्यात शिवशाहीचे मुख्यमंत्री म्हणून मनोहर जोशी आणि उपमुख्यमंत्री म्हणून भाजपाचे गोपीनाथ मुंडे यांना तत्कालीन राज्यपाल पी. सी. अलेक्झांडर यांनी शपथ दिली. २००३ मध्ये शिवसेनेचे कार्यकारी प्रमुख म्हणून उद्धव ठाकरे यांची निवड झाली आणि शिवसेनेच्या संघटनात्मक रचनेत पहिला बदल करण्यात आला. राज ठाकरे यांनीच महाबळेश्वर येथील शिबिरात उद्धव ठाकरे यांचे नाव शिवसेनेच्या कार्यकारी प्रमुखपदासाठी सुचविणारा प्रस्ताव मांडला होता. आता हिंदुत्व हेच शिवसेनेचे एकमेव धोरण राहील, अशी घोषणा त्याच शिबिरात बाळासाहेब ठाकरे यांनी केली होती. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे या शिवसेनेच्या दोन फांद्या आहेत, त्या छाटण्याचा प्रयत्न आजूबाजूच्या माणसांकडूनच होत असला, तरी राज-उद्धव यांच्यात कधीच कोणताही वाद नव्हता, अशी ग्वाही त्यांनी याच शिबिरात दिली होती. पुढे दोनच वर्षांत, २००६ मध्ये शिवसेनेला फुटीचे आणखी दोन नवे धक्के बसले. शिवसेनेत पैसे घेऊन पदे विकली जातात; या पक्षात पदांचा बाजार भरला आहे, असा गंभीर आरोप करीत नारायण राणे यांनी पुकारलेले थेट बंड आणि त्यांची हकालपट्टी हे शिवसेनेच्या भविष्याचे संकेत देणारी नांदी ठरू पाहात होती. शिवसेना ही धावती गाडी आहे. आतापर्यंत अनेक जण या धावत्या गाडीतून उतरून गेले, पण गाडी वेगाने चालतच राहिली. नारायण राणे शिवसेनेतून गेल्याने त्याचा काडीमात्र परिणाम होणार नाही, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी या फुटीवर भाष्य केले, पण भविष्य काही वेगळेच दिसू लागले होते. २००६ मध्ये जुलैच्या सुमारास नारायण राणे यांची पक्षातून हकालपट्टी झाली आणि काही महिन्यांतच राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर टीकेची झोड उठवत शिवसेना सोडण्याचा निर्णय जाहीर केला. राज ठाकरे यांच्या नाराजीची धग शिवसेनेत त्याआधीच जाणवू लागली होती. म्हणूनच १ ऑगस्ट २००५ या दिवशी खुद्द बाळासाहेबांनीच राज व उद्धव यांच्यासमवेत बैठक घेतली. संघटनेच्या हिताचे सर्व निर्णय उद्धव आणि राज एकत्र बसून घेतील, असे जाहीर करून मतभेद मिटल्याची ग्वाही त्या दिवशी बाळासाहेबांनी दिली होती. आज शिवसेना व महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांची युती झाल्यानंतर, महापालिका निवडणुकांसाठी जारी करण्यात आलेल्या संयुक्त वचननाम्याच्या मुखपृष्ठावर उद्धव ठाकरे, बाळासाहेब आणि राज ठाकरे यांचे छायाचित्र दिसते. त्या बैठकीनंतर दुसऱ्याच दिवशी 'हम साथ साथ है' अशा मथळ्याखाली वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाले, ते हेच छायाचित्र होते.

राज ठाकरे यांचा पक्षत्याग, उद्धव ठाकरे यांचे मुख्यमंत्रिपद, एकनाथ शिंदे यांच्या फुटीनंतर पक्षात सुरू झालेली गळती आणि महापालिका निवडणुकीत राज्यभर झालेली उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली पडझड ही ठाकरे यांच्या शिवसेनेच्या वर्तमानाची स्थिती आहे. वैभवी इतिहास असलेल्या या पक्षाचे वर्तमान आज दोलायमान झाले असल्याने भविष्यदेखील निश्चितच झाल्याचा स्पष्ट संदेश अलिकडेच झालेल्या विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्था आणि महापालिका निवडणुकांनी ठाकरे यांच्या शिवसेनेस दिला आहे. शिवसेनेच्या इतिहासाचे हे वर्तमान आहे. नेतृत्व सिद्ध करण्याच्या कसोटीच्या क्षणी बसणाऱ्या फटक्यांचा इतिहासावरही परिणाम होतो, वर्तमानही अस्वस्थ होते आणि भविष्यदेखील अनिश्चित होते, हा राजकारणातील नियम आहे. काँग्रेसची स्थिती अशाच अवस्थेतून वाट काढत आहे. या पक्षाचा देशाच्या राजकीय इतिहासावरील प्रभाव, इतिहासाच्या शतकोत्तर वाटचालीत या पक्षाने जनमानसाची घेतलेली अभेद्य पकड आणि दीर्घकाळ एकहाती सत्तेच्या माध्यमातून सत्ताकेंद्रावर प्रस्थापित केलेला हक्क हा या पक्षाचा इतिहास आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच्या चळवळी, आंदोलने आणि संघर्षांच्या नेतृत्वाचा झेंडा खांद्यावर घेऊन ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष करणाऱ्या फळीचे नेतृत्वच या पक्षाने केले असल्याने, स्वातंत्र्यानंतर स्थापन होणाऱ्या सरकारची धुरा या पक्षाच्या खांद्यावर साहजिकपणे सोपविली गेली आणि सत्ता म्हणजे काँग्रेस हे समीकरण ठरून गेले. पुढे जवळपास तीन दशके या समीकरणात कोणताही धक्का लावण्याची कोणाचीच हिंमतही होत नव्हती, एवढी शक्ती या पक्षाने प्रस्थापित केली होती. नेतृत्वाच्या वादावरून पक्षांतर्गत कुरबुरी होऊनही, उघड संघर्ष टाळण्याचा मुत्सद्दीपणा दाखवत सबुरीचे धोरण स्वीकारणाऱ्या नाराजांची संख्या या पक्षात कमी नव्हती. शिवसेनप्रमाणेच नेतृत्वाच्या संघर्षातूनच या पक्षातील फूट पडली आणि स्वातंत्र्यापूर्वीच्या काँग्रेसच्या परंपरेचा झेंडा खांद्यावर घेण्याचा पहिला हक्क मात्र भारतीय राष्ट्रीय काँग्रेस नावाच्या पक्षाला मिळाला.

तेव्हापासूनच्या इतिहासाचा धांडोळा घेत काँग्रेसच्या वर्तमानापर्यंतची वाटचाल पाहिली, तर नेतृत्वाच्या कसोटीच्या क्षणी बसलेल्या असंख्य फटक्यांमुळे हा पक्ष असाच जर्जर होत गेल्याचे दिसते. १९६४ मध्ये पंडित नेहरूंच्या निधनानंतर काँग्रेसमध्ये सत्ताकेंद्र रिक्त झाले होते. १९६६ मध्ये लालबहादूर शास्त्रींच्या आकस्मिक निधनानंतर कामराज, निजलिंगप्पा, मोरारजी देसाई, स. का. पाटील, अतुल्य घोष आदींनी सिंडिकेट काँग्रेस असे म्हटले जाणारा अदृश्य पण प्रभावी असा सत्तागट निर्माण केला. इंदिरा गांधी तरुण, अननुभवी आहेत, त्यांना रबर स्टॅम्प पंतप्रधान बनवू आणि सत्तेच्या नाड्या आपल्या हाती ठेवू, अशी त्यांची समजूत होती. पण, १९६९ मध्ये राष्ट्रपती निवडणुकीत इंदिरा गांधी यांनी धूर्त खेळीतून ही समजूत धुळीस मिळविली. सिंडिकेट काँग्रेसचा उमेदवार पराभूत झाला आणि काँग्रेसमध्ये स्पष्ट फूट पडली. इंदिरा गांधींकडे पक्ष संघटना नव्हती, बहुसंख्य खासदारही नव्हते आणि पक्षातील जुने नेते दुरावले होते. त्यामुळे अशा स्थितीचा सामना करण्याचा सर्वांत प्रभावी मार्ग, म्हणजे जनतेचा भक्कम पाठिंबा मिळविण्याचा निर्धार करून त्या थेट जनतेमध्ये गेल्या, जनतेशी संवाद साधला. गरिबी हटाव सारखी जनतेच्या भावना सुखावणारी घोषणा दिली आणि राजकारणाचा बाज बदलून टाकला. १४ बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा निर्णय घेऊन सिंडिकेट काँग्रेसच्या आर्थिक सत्तेची रसद संपुष्टात आणली आणि गरिबांची नेता अशी प्रतिमा निर्माण करणाऱ्या इंदिरा गांधी पुन्हा प्रभावशाली ठरल्या. १९७१ च्या निवडणुकीत ३५२ जागांवर विजय मिळवून इंदिरा गांधींनी जनतेचा कौल आपल्या बाजूला असल्याचे सिद्ध केले. बंडखोरांचा गट राजकीयदृष्ट्या संपला आणि काँग्रेस पक्ष इंदिराकेंद्रित झाला. सरकारवर आणि पक्षसंघटनेवरही नेतृत्वाची छाया राहिली. निर्णायक नेतृत्व, स्पष्ट वैचारिक संघर्ष, धाडसी धोरणे आणि जनतेशी थेट नाते या चतु:सूत्रीमुळे इंदिरा गांधींचे नेतृत्व यशस्वी ठरले.

हा काँग्रेसच्या तेजस्वी काळाचा इतिहास होता. शिवसेना आणि काँग्रेसच्या आजच्या वाटचालीकडे पाहता, या इतिहासापासून दोन्ही पक्षांनी फारकत घेतली असावी, असेच चित्र दिसते. इंदिरा गांधींनी जनतेत जाऊन पक्षांतर्गत बंड मोडले. आजच्या काँग्रेसकडे अंतर्गत बंडास निर्णायक उत्तर नाही. स्पष्ट वैचारिक धोरणाचा अभाव आणि कोणाशी लढायचे, याचा संभ्रम या तिहेरी संभ्रमात काँग्रेसचा वर्तमानकाळ गुरफटला आहे.

गेल्या १०-१५ वर्षांत राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने अनेक निवडणुका लढविल्या. काही ठिकाणी आशा निर्माण झाली, पण अनेक ठिकाणी काँग्रेसच्या पदरात निराशाच पडली. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाविषयी पक्षातील अपेक्षाभंगाच्या व्यथा आता व्यक्त होऊ लागल्या आहेत. भारताच्या राजकारणात राहुल गांधी हे नाव उपहासापुरते राहिले आहे, हे वर्तमान आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीनंतर मात्र भविष्याचे चित्र अधिक आशादायक दिसेल, असे संकेत काँग्रेसला मिळू लागले आहेत. याचे श्रेय राहुल गांधींना द्यावे किंवा नाही, याबाबत पक्षात मतभेद निश्चितच आहेत. कारण २०१४ आणि २०१९ या दोन लोकसभा निवडणुकांतील पराभवाने काँग्रेस अक्षरशः खिळखिळी झाली. भारताच्या राजकारणात प्रभावीपणे सुरू झालेल्या मोदीयुगाच्या झंझावातामुळे काँग्रेस केवळ सत्तेबाहेर ढकलली गेली, एवढेच नाही, तर काँग्रेसचा राजकीय आत्मविश्वासही डळमळीत झाला. राहुल गांधी यांच्याकडे पक्षाचे अध्यक्षपद आले, पण संघटन, नेतृत्व, कार्यकर्त्यांची जडणघडण, निवडणूक रणनीती यात काँग्रेस पिछाडीवरच राहिली. २०१९ मधील राहुल गांधींचा अमेठीतील पराभव हा केवळ काँग्रेसला सोसावा लागलेला एका मतदारसंघातील पराभव नव्हता, तर काँग्रेसच्या पारंपरिक गडाला पडलेले खिंडार होते. राहुल गांधींच्या नेतृत्वशैलीवर तेव्हापासूनच प्रश्नचिन्हे उमटण्यास सुरुवात झाली होती. २०२४ च्या निवडणुकीत पक्षाला बऱ्यापैकी यश मिळाले; राज्यांच्या निवडणुकांत पक्ष मात्र मतदारांच्या दृष्टीने उपेक्षितच राहिला. पक्षाकडे स्वतःचा चेहरा नाही, ठोस संघटन नाही, स्थानिक नेतृत्वाचा अभाव, अशा अनेक कमतरतांचा सामना काँग्रेसला करावा लागत आहे. राजकारणात केवळ नैतिक बळ पुरेसे नसते. निवडणुका जिंकणारा, संघटना बांधणारा आणि सर्वांना सोबत घेऊन चालणारा नेता असावा लागतो. सध्या राहुल गांधींची काँग्रेस आणि ठाकरे यांच्या शिवसेनेत त्याचाच अभाव दिसतो. म्हणूनच इतिहासातील साम्यस्थळे आणि वर्तमानातील अस्वस्थता याबाबत दोन्ही पक्ष एकाच वाटेवर चालताना दिसत आहेत.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### 'तरुण भारत'चे पुण्यात स्वागत

दैनिक 'तरुण भारत' नागपूर आता पुणे येथून प्रकाशित होणार ही आनंदाची बातमी आहे. तरुण भारत हे केवळ वृत्तपत्र नाही तर विचार आहे. माझे बालपण, शिक्षण, प्रारंभीची नोकरी अमरावतीत झाल्याने तरुण भारतसोबत एक भावनिक नाते आहे. वृत्तपत्र म्हणजे तरुण भारत असे समीकरण आहे. ग. त्र्यं. माडखोलकर, मा. गो. वैद्य, दि. भा. घुमरे, ल. त्र्यं. जोशी यासारख्या संपादकांनी तरुण भारतातील नीतिमत्ता कधीही ढळू दिली नाही आणि एक उच्च परंपरा स्थापित केली. ''चांगले राज्य चांगल्यांचे राज्य'' यासारखे लेख अजूनही स्मरणात आहेत.

मला आठवतो तो १९७१ दरम्यानचा १६ पैसे मूल्य असलेला तरुण भारत! युद्ध कर व (बांगला देशातील) शरणार्थी कर यामुळे ४ पैशांनी किंमत वाढली होती. १९७१च्या युद्धसमयी माझा शालनायक असलेला मोठा भाऊ विजय कद्रे शाळेतील प्रार्थनेपूर्वी तरुण भारतमधील युद्धविषयक बातम्या वाचून दाखवीत असे. त्यावेळी विद्यार्थ्यांनी दिलेली 'भारत माता की जय' ही घोषणा गगनभेदी असायची. आणिबाणी कालावधीत तरुण भारत बंद पडावा यासाठी अनेक प्रयत्न झालेत. सरकारी जाहिराती बंद केल्या, व्यावसायिकांनी जाहिराती देऊ नये असे पत्र पाठविले गेले, सरकारी कार्यालयांनी तरुण भारत विकत घेऊ नये असा दबाव आणला गेला. तरीही बावनकशी सोने उजळून निघावे तसे वाचकांच्या पाठिंब्यावर दैनिक तरुण भारत या अग्निदिव्यातून बाहेर आले. संयमी संपादकीय व विचारप्रवर्तक लेख हे तरुण भारतचे वैशिष्ट्य सांगता येईल.

राष्ट्रीय महामार्गाच्या एका प्रकल्पावर पुणे इथे अभियंता म्हणून २०११ मध्ये रुजू झालो आणि 'विदर्भवासी पुणे निवासी' झालो. पुणे महानगरात तरुण भारत नाही याची तीव्र जाणीव २०१४ मध्ये झाली. पुणे इथून तरुण भारत प्रकाशित व्हावा यासाठी अनेकांना विनंती करणारे पत्र पाठविले. विलंबाने का होईना तरुण भारत येथून सुरू होत आहे याचे स्वागत आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात शिरकाव करणे, स्थिर होणे आव्हानात्मक असले तरी तरुण भारतचे वाचक भरभरून प्रतिसाद देतील याची खात्री आहे.

**हेमंत पुरुषोत्तम कद्रे**/९४२२२१५३४३

### तिलोत्सव

तिळाच्या विषयी काही उपयोगिता सांगताना मला माझ्या लहानपणात हिंडून आल्याचा अनुभव येणार आहे. तुम्हालाही नक्कीच तसे वाटणार! सर्वसामान्यांना सहज उपलब्ध होणारे तिळ हे पीक दिवाळीच्या दरम्यान शेतकऱ्यांच्या हाती आणि नंतर बाजारात येते. आरोग्यासाठी किती उपयोग होतो याचा सूक्ष्म अभ्यास आपल्या पूर्वजांनी, ऋषिमुनींनी केला. शरीराचे आरोग्य, मानसशास्त्र, सामाजिक सलोखा यांचे एकत्रीकरण म्हणजे आपले अनेक सण, उत्सव परंपरा. आपली आजी, नानी, मोठी काकू, सगळे जण या सर्व चालीरीती पाळत असत. संपूर्ण गाव सणवार, समारंभ अतिशय उत्साहात साजरे करीत असत. स्वतःचा, कुटुंबाचा विचार करताना समाजाशी जुळलं पाहिजे हा कटाक्ष होता. मनुष्य एकटा राहू शकत नाही. जसजसा काळ लोटला तसतसं सणवार म्हणजे बुरसटलेल्या पद्धती हा विचार रुजू लागला. जुन्या परंपरा न पाळणे म्हणजे आम्ही मॉडर्न असे पसरू लागले. लहान असताना घरातील वयोवृद्धांना हे का? असंच का अशी विचारण्याची पद्धत नव्हती आणि हिंमतही नव्हती. आरोग्याचा बटवा होता या आज्यांजवळ सणावारांसहित! अगदी कडक नियमांनुसार! तिळाचा लाडू रोज एकच मिळायचा.

तिळाचा उत्सव सुरू होतो तो दिवाळीपासून. तिळाच्या तेलाने मालिश करून अभ्यंग स्नानाने सुरुवात होते. रात्रभर भिजलेल्या तिळाला सकाळी वरवंटा पाट्यावर वाटून त्याच्या उटण्याने अंघोळ करणे. साल स्क्रबचे काम करते आणि पाण्यात मुरलेलं तेल त्वचेला स्निग्धता देते. सकाळच्या गारठ्यामुळे त्वचेला रुक्षता न येता त्वचा मऊ तजेलदार होते. दिवस लहान होत जातो, हवेतील उष्णता कमी होत जाते अशावेळी तिळाचे तेल त्वचेतून उष्णता उत्सर्जित होऊ देत नाही. तिळ हा तैल पदार्थ असून त्यातील स्निग्ध गुण आरोग्यासाठी फायदेशीर आहेत. त्यात ओमेगा ३ व ओमेगा ६ फॅटी ॲसिड असतात जे शरीरातील कोलेस्टेरॉलची पातळी योग्य प्रमाणात ठेवण्यास मदत करतात. तिळात कॅल्शियम भरपूर असते जे आपल्या शरीरातील हाडे मजबूत करण्यास मदत करतात. तिळात मॅग्नेशियम, झिंक, ॲन्टिऑक्सिडंन्ट असतात. असे हे गुणकारी तिळ हिवाळाभर खाणे फायदेशीर असते. सूर्याचे मकर राशीत होणारे संक्रमण मकरसंक्रांत सण म्हणून महाराष्ट्रात, गुजरातमध्ये मोठ्या उत्साहात साजरा करतात. संपूर्ण भारतात वेगवेगळ्या नावांनी, प्रकाराने हा उत्तरायणाचा उत्सव वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. सूर्याचे किरण पृथ्वीवर सरळ येणार, उष्णता वाढणार याची जागृती हा सण करून देतो.

मकरसंक्रांतीला सारे एकमेकांना तिळगूळ देतात आणि शुभेच्छा देतात. रथसप्तमीपर्यंत हळदीकुंकू करतात. सर्व स्त्रिया एकमेकींना घरी बोलावतात, हळदी-कुंकू लावतात, वाण वाटतात. नवीन सुनेचा संक्रांत सण किंवा तिळवा, लहान बाळाचे बोरन्हाण किंवा लूट करतात. त्या निमित्ताने नुकतेच लग्न झालेल्या सुनेची सगळ्या नातेवाईक, मित्रमैत्रिणी यांच्याशी ओळख होते. नवीन सुनेला काळे वस्त्र परिधान करतात. तिला तिळाचे दागिने घालतात. पतंगांचे डेकोरेशन असते. तिळाच्या वस्तू प्रदर्शनात ठेवतात. लहानग्यांना काळा पोशाख देतात. औक्षण केल्यानंतर बोरं, ऊस, चॉकलेट्स, तिळाच्या रेवड्या या खाऊची लूट करतात.

असा हा तिलोत्सव रथसप्तमीपर्यंत चालतो. आता मात्र तिळाला, काळ्या कपड्यांना सायोनारा म्हणायची वेळ येते. हेमंत, शिशिर ऋतू संपून वसंताची तयारी करण्याची वेळ येते. हळूहळू दिवस मोठाही होतो आणि हवेत उष्मा जाणवू लागतो. अशी ही तिलोत्सवाची कहाणी आहे.

**डॉ. उज्ज्वला सतीश देशमुख**/९४२२८०७२४७

### भारतीय खेळाडूंनी सेरेना विल्यम्सचा आदर्श घ्यावा



अमेरिकेची प्रसिद्ध टेनिसपटू सेरेना विल्यम्स सध्या जगभरात चर्चेचा विषय ठरली आहे. आपल्या टेनिस कारकीर्दीत तिने शेकडो पुरस्कार आणि कोट्यवधी रुपयांची संपत्ती कमावली आहे. सध्या वयाच्या ४४ वर्षांच्या टप्प्यावर सेरेनाने उचललेले पाऊल कौतुकाची घटना ठरली आहे. अतिशय शांतपणे तिने आपली पाचशे दशलक्ष डॉलर्सची संपत्ती, सर्व शेअर्स, मालमत्ता, दागिने बेघर लोकांसाठीच्या रुग्णालयासाठी दान केले आहे. केवळ संपत्तीचं नव्हे तर तिने तिच्या तेवीस ग्रॅन्डस्लॅम ट्रॉफीज देखील वितळवून त्याचा पैसा रुग्णालयाच्या उभारणीसाठी खर्च केला आहे. अमेरिकेतील लॉस एंजेलिस या प्रसिद्ध शहरातील स्किड रो भागात कसलाच निवारा नसलेल्या तसेच कुठलाही वैद्यकीय विमा नसलेल्या उपेक्षित लोकांसाठी भव्य रुग्णालय उभारण्याचा संकल्प सिद्धीस जात आहे. बाराशे खाटांचे हे रुग्णालय गोरगरीब रुग्णांसाठी संपूर्णपणे मोफत असणार आहे. सध्या रुग्णालयाचे बांधकाम सुरू असून तेथील बांधकाम कामगारांनी दिलेल्या माहितीनुसार सेरेना गेल्या चार महिन्यांपासून साईटवरच तंबू ठोकून या कामाची पाहणी करीत आहे.

टेनिसच्या क्षेत्रात प्रचंड यश मिळवून तसेच मोठी कीर्ती संपादन करूनदेखील जमिनीवर असलेली खेळाडू म्हणून सेरेनाकडे पाहिले पाहिजे. आपण कमावलेला पैसा आणि संपत्ती हे समाजाचेच देणे असल्याची भावना व्यक्त करीत ती संपत्ती पुन्हा समाजालाच अर्पण करण्याची सेरेनाची दानशूर वृत्ती अनुकरणीय ठरते. कारण संपन्न राष्ट्र असलेल्या अमेरिकेतही गरीब लोकांची संख्या कमी नाही. त्यांच्यासाठी भरीव योगदान देणाऱ्या सेरेनाचा आदर्श इतर खेळाडू आणि सेलिब्रेटींनी घेण्यास हरकत नाही. या पृष्ठभूमीवर भारतातील स्थिती पाहता अतिशय खंत वाटते.

क्रिकेटच्या माध्यमातून अब्जावधी रुपये कमावलेल्या स्टार खेळाडूंना अजूनही संपत्ती कमावण्याची हाव दिसून येते. परंतु, ज्या देशाने किंवा ज्या देशातील समाजाने आपणास इथपर्यंत पोहोचवले किंवा आपल्या यशाला कारणीभूत ठरले त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी आपले खेळाडू नेहमीच दडवत आले आहेत. सेरेनासारख्या जगप्रसिद्ध खेळाडूंकडून भारतीय खेळाडूंनी अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. सामाजिक बांधिलकी जपण्याकडे प्रत्येकानेच आज लक्ष देण्याची गरज आहे. त्यातही वलयांकित आणि अब्जाधीश खेळाडूंकडून जनतेला खूप अपेक्षा आहेत.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### मुख्यमंत्री फडणवीसांचा मास्टरस्ट्रोक

बृहन्मुंबई महानगरपालिकेची निवडणूक ही राज्याच्या राजकारणातील सर्वांत प्रतिष्ठेची लढाई मानली जात होती. गेल्या तीन दशकांपासून या आर्थिक सत्तेवर शिवसेना उबाठाचे वर्चस्व होते. मात्र, या सत्तेला सुरुंग लावत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपा-सेना (शिंदे गट) युतीसाठी मुंबईचा गड सर केला. या निवडणुकीत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे दोन्ही बंधू मराठी अस्मिता आणि हिंदी सक्तीच्या मुद्यावरून एकत्र आले होते. मात्र मुंबईकरांनी त्यांच्या भावनिक आवाहनापेक्षा विकासाला कौल दिला. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत जनतेने भाजपा-सेना युतीला कौल दिला होता. मात्र, मुख्यमंत्रिपदाच्या अट्टहासापोटी उद्धव ठाकरे यांनी नैसर्गिक युती तोडून काँग्रेस-राष्ट्रवादीशी हातमिळवणी केली. ''शिवसैनिकाला मुख्यमंत्री करण्याचे बाळासाहेबांना दिलेले वचन पूर्ण करण्यासाठी मी हा निर्णय घेतला'' असे समर्थन त्यांनी केले खरे, परंतु भाजपा-सेना युतीला मतदान करणाऱ्या निष्ठावान मतदारांना हा कौलचा अपमान वाटला.

उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात कायदा-सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला. साधूंची हत्या, सुशांत सिंह राजपूत प्रकरण, मनसुख हिरेन प्रकरण आणि गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर झालेला १०० कोटींच्या वसुलीचा आरोप, यामुळे सरकारची प्रतिमा डागाळली. सोशल मीडिया पोस्टवरून झालेली कारवाई आणि हिंदुत्वापासून झालेली फारकत यामुळे शिवसेनेत मोठा उठाव झाला. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ५० आमदारांनी बाहेर पडत भाजपासोबत नवे सरकार स्थापन केले.

सत्तांतरानंतर फडणवीस-शिंदे सरकारने पायाभूत सुविधा आणि लाडकी बहीणसारख्या योजनांद्वारे जनतेचा विश्वास संपादन केला. लोकसभा निवडणुकीत संविधान बदलणार या खोट्या प्रचारामुळे भाजपाला काही जागा गमवाव्या लागल्या. मात्र विधानसभा आणि महापालिका निवडणुकीत त्यांनी या चुका दुरुस्त केल्या. दुसरीकडे, ठाकरे बंधूंनी पुन्हा मराठी माणूस आणि मुंबई तोडणार ही जुनीच रट लावून धरली. मात्र, ज्या राज ठाकरेंना विधानसभेत एकही जागा जिंकता आली नाही, त्यांच्याशी युती करूनही मुंबईकरांनी उद्धव ठाकरेंना प्रतिसाद दिला नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेली कामांची शिदोरी मतदारांना भावली. हा विजय म्हणजे केवळ सत्तापालट नसून, मुंबईकरांनी विकासाच्या राजकारणावर मारलेली मोहर आहे.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

### ऋतू बसंत उपजे नवेली

काक: कृष्ण पिक: कृष्ण
को भेदो पिक काकयो:
वसंत समये प्राप्ते काक: काक पिक: पिक...

आपण लहापणापासून हे सुभाषित ऐकत आलोय. कावळा आणि कोकिळ दोघेही काळे असल्यामुळे दोघांमध्ये फरक करणे कठीण असते परंतु वसंत ऋतूचे आगमन होताच ऋतुबदलाने प्रसन्न होऊन कोकिळ गाऊ लागतो आणि कावळा काव काव करतो तेव्हा दोघांतील फरक लक्षात येतो. अशा अर्थाचा हा श्लोक आहे.

म्हणजे सगळ्यात आधी पशुपक्ष्यांना वसंत आपली चाहूल देतो. खरं तर ही चाहूल लागते ती माघातच. संक्रांतीनंतर सूर्याचं उत्तर गोलार्धात संक्रमण झाल्यानंतर वातावरण ऊबदार व्हायला लागतं. झाडांना नवी पालवी फुटते. आंब्याला मोहोर येऊ लागतो आणि साऱ्या सृष्टीत चैतन्य पसरू लागतं. या उल्हसित चित्तवृत्तीचे उत्सवात रूपांतर न झाले तरच नवल. वसंत पंचमी हा उत्सव भारतात सर्वत्र साजरा करतात. हा दिवस देवी सरस्वती आणि लक्ष्मी यांचा जन्मदिवसही मानला जातो. पै वसंताचे रिगवणे झडाचेनी साजेपणे या माउलींच्या ओवीत सांगितल्याप्रमाणे साऱ्या सृष्टीचं शिशिरात हरवून गेलेलं वैभव पुन्हा दोन्ही हातांनी तिला भरभरून देणाऱ्या वसंत ऋतूची चाहूल कुणाच्याही न कळत 'मी येतोय, कमिंग सून' असं वारंवार रिमाइंडर न देता अलगद येतो. तो कळतो तो मोहरीच्या झाडातून, नव्या पालवीतून, आंब्याच्या मोहराच्या तुऱ्यातून, अलगद येणाऱ्या मोगऱ्याच्या मंद झुळकीतून.

साद कोकिळ घालतो, कधी वसंत येईल, पान गळल्या तरुला नवी पालवी देईल. अशी साद घालताना सगळी धरती उत्साहाने वसंताचे स्वागत करते. संगीतातील बसंत राग चैतन्य निर्माण करतो आणि त्या स्वरातून आपल्याही मनातील वसंताला नवी पालवी फुटून उत्साहाच्या लहरी निर्माण करतात. म्हणूनच आपल्या विभूती सांगताना भगवान श्रीकृष्णांनी ऋतूंमध्ये मी वसंत ऋतू आहे. ऋतूनां कुसुमाकर: असं सांगितलंय. त्यामुळे इतकं मोहक, उत्साहवर्धक असल्यावर शुभही असणारच.

धनश्रीताई लेले सांगतात, एकदा रवींद्रनाथजी पांढरा झब्बा घालून बसले होते. ते अचानक उठून खोलीत गेले आणि केशरी रंगाचा झब्बा घालून आले. इतरांनी आश्चर्याने त्यांच्याकडे बघितल्यावर ते म्हणाले, ''मला मोगऱ्याचा मंद सुगंध आला म्हणजे निसर्गाने वसंताची चाहूल दिली मग त्याचे स्वागतही त्याच्या रंगानेच करायला हवे ना, म्हणून हा बदल.'' अलगद येणारा वसंतही धन्य आणि तितक्याच नजाकतीने समजून घेणारे रवींद्रनाथही धन्य.

आपणही आपल्या मरगळलेल्या मनाला झटकून टाकू आणि नवचैतन्य आणणाऱ्या वसंत ऋतूला उत्स्फूर्त दाद देऊन जीवनात फुललेल्या कमानीखालून जाऊन सकारात्मक रंगांची उधळण करूया.

कधी सुरा सुरांनी, ऋतुगंध शब्दलेणे,
आनंद शब्दगंध, गाऊ वसंत गाणे...

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

### बालविवाह थांबवा, मुलींना सक्षम करा

समाजाच्या विकासासाठी स्त्रियांचे योगदान नेहमीच महत्त्वपूर्ण राहिलेले आहे. समाजातील महिलांच्या अस्तित्वाची व कार्याची जाणीवपूर्वक दखल घेऊन महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीमुक्ती चळवळ राबवली. स्त्रियांनाही विकासाची संधी मिळावी म्हणून फुले दाम्पत्याने मुलींच्या शिक्षणासाठी पहिली शाळा काढून स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्यामुळे स्त्रियांचे अस्तित्व आज समाजात टिकून आहे. स्त्रीच्या कर्तबगारीमुळेच मानवाने चंद्रावर पाऊल ठेवण्यात यश प्राप्त केले आहे. या यशात अंतराळात जाऊन मोलाचे योगदान देणारी पहिली भारतीय महिला म्हणजे कल्पना चावला. या सोबतच इतरही विविध क्षेत्रांत अनेक महिलांनी आपल्या प्रतिभेचे दर्शन घडविले आहे. भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी तसेच बचेंद्री पाल, पी. व्ही. सिंधू, हिमा दास असो की, किरण बेदीप्रमाणे स्वत:ला सिद्ध करणाऱ्या कर्तबगार महिला असोत. त्या कोणत्याच क्षेत्रात कमी नाही. यांच्याप्रमाणेच अनेक मुली एकीकडे आपले व आपल्या कुटुंबाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जिवाचे रान करतात आणि यश संपादन करून स्त्रीशक्तीला सिद्ध करतात. तर दुसरीकडे मात्र समाजाकडून मुलींचा बालविवाह केला जातो व त्यांच्या विकासाला खीळ बसवली जाते. यामुळे मुलींच्या व पर्यायाने देशाच्या विकासात मोठी बाधा निर्माण होते. ही बाधा निर्माण करणाऱ्या बालविवाहाच्या अनेक घटना आताच्या विज्ञान युगातही मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने ''बालविवाहमुक्त महाराष्ट्र आपला संकल्प अभियान'' राबविण्यात येत आहे. बालविवाह एक मोठी सामाजिक समस्या आहे. ज्यामुळे मुलींच्या हक्कांवर, आरोग्यावर आणि तिच्या भविष्यावर खोलवर परिणाम होतो. बालविवाहामुळे मुलीचे शिक्षण खंडित होते. अल्पवयातच गर्भधारणा व लैंगिक शोषणाला तिला सामोरे जावे लागते. म्हणूनच बालविवाह ही एक कुप्रथा आहे. प्राचीन काळातील जटिल धार्मिक बंधने, रूढी, परंपरा यामुळे बालविवाह घडून येत होते. ही प्रथा बंद करण्यासाठी १२ व्या शतकातील महात्मा बसवेश्वरांपासून राजा राममोहन रॉय, केशव चंद्र अशा थोर समाजसुधारककांनी बालविवाह प्रथेला कडाडून विरोध केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातून कायद्याच्या रूपाने स्त्रीला प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने अधिकार दिला. त्याचप्रमाणे शासनाने बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ अंमलात आणून बालविवाहाला बंदी घातलेली आहे. बालविवाहामुळे मुलींच्या शिक्षण घेण्याच्या, खेळण्या-बागडण्याच्या बालवयातच विवाहाचा आघात त्यांच्या माथी मारला जातो. रूढी, परंपरा, धार्मिक बंधने, अज्ञान, प्रेमविवाह, परिवारातील अनेक सदस्यांची जबाबदारी अशा अनेक कारणांमुळे बालविवाह घडून आल्याचे दिसतात. तसेच ग्रामीण भागातील अनेक मुलींचे शिक्षण पूर्ण होत नाही. उच्च शिक्षणाच्या संधी गावापासून दूर असतात. त्यातच दळणवळणाच्या, जाण्यायेण्याच्या साधनांचा अभाव असतो. त्यामुळे शिक्षण थांबते व कुटुंबात मुलींच्या लग्नाची घाई केली जाते. त्यामुळेही मुलींना बालविवाहाला बळी पडावे लागते. मुलींचे शिक्षण पूर्ण होण्यावर भर देणे गरजेचे आहे. एक मुलगी शिकली की कुटुंब शिकतं, कुटुंब शिकलं की समाज आणि समाज शिकला की देश प्रगतिपथावर जातो. म्हणून सशक्त, सुदृढ देशाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी बालविवाह थांबलेच पाहिजे.

**राजश्री खाजोने**/९६६५६८०६३९

### ठाकरे बंधू वाचाळवीर ठरले

महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुकीत महायुतीने अभूतपूर्व यश संपादन केले आणि पुन्हा एकदा सर्वांगीण विकास हाच मुद्दा मतदारांना पटवून देण्यात यशस्वी ठरले. भारताची आर्थिक राजधानी मुंबईवर सलग २७ वर्षे राज्य केलेल्या ठाकरे कुटुंबीयांना मतदारांनी भाषावाद, प्रांतवादपेक्षा सुशासन, सुरक्षा आणि विकासाला प्राधान्य दिल्याने हा निर्णय ऐतिहासिक ठरतो. या निर्णयाने उबाठाचे अस्तित्व नाकारले आहे. मोठ्या सभा आयोजित करून व्यक्तिगत टीका, व्यंगात्मक व अभद्र भाषा वापरून मतदारांना जिंकता येत नाही, हे ठाकरे बंधूंना आता कळले नाही आणि त्यांनी त्यांच्यात सुधारणा केली नाही तर उरले सुरले कार्यकर्ते देखील सोबत राहणार नाहीत, हा इशारा या निवडणुकीने दिला आहे. मुंबईमध्ये या पुढाऱ्यांना मतदारांनी सत्ते पासून दूर ठेवले यासाठी देशातील सर्व नागरिक त्यांच्या ऋणात राहतील. ७२ हजार कोटींचा अर्थसंकल्प असलेले हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर या वाचाळवीरांच्या तावडीतून काढल्यामुळे मुंबईचे सर्व मतदार अभिनंदनास पात्र आहेत.

**संजय पाठक**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच कुठलाही लेख पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## संक्षिप्त वृत्त...

### दुधना, करपरा व कसुरा नद्यांच्या पुनर्जीवनासाठी जलसंपदा मंत्र्यांना साकडे

**सेलू,/प्रतिनिधी :** सेलू तालुक्यातील दुधना, करपरा व कसुरा या तीन प्रमुख नद्यांचे पुनर्जीवन व खोलीकरण तातडीने करण्यात यावे, तसेच लोअर दुधना धरणाचे रखडलेले काम पूर्ण करावे, अशी मागणी स्थानिक नागरिक व शेतकरी प्रतिनिधींनी मुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्र्यांना निवेदनाद्वारे केली आहे.

यापूर्वी मार्च २०२५ मध्ये या संदर्भात सविस्तर निवेदन देण्यात आले होते. मात्र, त्यावर अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने पुन्हा एकदा ही मागणी करण्यात आली आहे. सेलू तालुक्यातील दुधना नदीवर उभारण्यात आलेल्या लोअर दुधना धरणाचे काम अद्याप अपूर्ण असून सध्या केवळ सुमारे ७५ टक्के क्षमतेपर्यंतच पाणी साठवणूक शक्य आहे. उर्वरित कामे अपूर्ण असल्याने धरणाचा लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांना अपेक्षित फायदा मिळत नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

धरणाच्या पुढील नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर झालेल्या वाळू उपशामुळे व नैसर्गिक कारणांमुळे दुधना नदीचे पात्र उथळ झाले असून पाणी साठवण क्षमतेत घट झाली आहे. तसेच काटेरी झुडपे व अडथळ्यांमुळे पाण्याचा प्रवाह अडथळलेला आहे. त्यामुळे धरणाच्या पुढील पात्रासह या नदीस मिळणाऱ्या लहान-मोठ्या नाल्यांचे तातडीने खोलीकरण करण्याची मागणी करण्यात आली आहे. यामुळे पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून 'पाणी अडवा, पाणी जिरवा' योजना प्रभावीपणे राबविता येईल, असा दावा करण्यात आला आहे.

करपरा व कसुरा नद्यांची स्थितीही गंभीर असून या नद्यांच्या प्रभाव क्षेत्रात प्रामुख्याने हंगामी शेती केली जाते. पावसावर अवलंबून असलेली शेती, उन्हाळ्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाई तसेच जनावरांच्या पाणी व चाऱ्याचा प्रश्न या भागातील नागरिकांसाठी कायमचा ठरलेला आहे. नदीपात्र उथळ झाल्याने पावसाळा संपताच नद्या कोरड्या पडतात व परिसरातील विहिरी आटतात, अशी माहिती निवेदनात देण्यात आली आहे.

या तीनही नद्यांच्या लाभ क्षेत्रात सुमारे ६० ते ७० गावांचा समावेश असून पुनर्जीवन व खोलीकरणाची कामे पूर्ण झाल्यास या भागातील शेतकऱ्यांना बारमाही शेतीसाठी पाणी उपलब्ध होईल, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटेल तसेच जनावरांच्या चारा-पाण्याची समस्या कमी होईल, असा विश्वास निवेदनकर्त्यांनी व्यक्त केला आहे. 'जलयुक्त शिवार' योजनेअंतर्गत या नद्यांचे पुनर्जीवन करण्यासाठी तातडीने निधी मंजूर करावा व उन्हाळ्यातच कामे पूर्ण करावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

### रुस्तुमराव तुकारामजी (आरटी) देशमुख पळशीकर यांचे निधन

**परभणी,/प्रतिनिधी:** येथील दर्गा रस्त्यावरील बँक कॉलनीतील ज्येष्ठ नागरीक रुस्तुमराव तुकारामजी (आरटी) देशमुख पळशीकर यांचे शुक्रवार १६ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३७ मिनीटांनी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी शांताबाई, मोठा मुलगा बबनराव, संदीप, सून सौ. आशा देशमुख व नाती असा मोठा परिवार आहे. दरम्यान, त्यांच्या पार्थीवावर शनिवारी सकाळी मानवत ते वालूर या रस्त्यावरील इरळद येथील मळ्यात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील नागरीक उपस्थित होते.

### महाविकास आघाडी कडून जिल्हा परीषेदे करीता उमेदवाराची निवड

**सेलू,/प्रतिनिधी :** परभणी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीची तारीख अखेर निवडणूक आयोगाने जाहीर केल्याने गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. या पार्श्वभूमीवर सेलू तालुक्यातील पाच जिल्हा परिषद गटांसाठी उमेदवार निश्चितीची प्रक्रिया पूर्ण झाली असून, उमेदवार निवडीत महाविकास आघाडी आघाडीवर ठरल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

सेलू तालुक्यात एकूण पाच जिल्हा परिषद गट आहेत. यामध्ये देऊळगाव गट हा सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव असून या गटातून राष्ट्रवादी काँग्रेसकडून सौ. ऊर्मिला नामदेव अप्पा डख यांना उमेदवारी देण्यात आली आहे. रवळगाव गट हा ओबीसी महिला प्रवर्गासाठी राखीव असून या गटातून सौ. अर्चना अप्पासाहेब लहाने निवडणूक रिंगणात उतरल्या आहेत. कूपटा गट हा ओबीसी पुरुष प्रवर्गासाठी राखीव असून या गटातून प्रकाश मुळे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. वालूर गट हा सर्वसाधारण पुरुष प्रवर्गासाठी असून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून राम खराबे पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर चिकलठाणा गट हा सर्वसाधारण पुरुष प्रवर्गासाठी असून या गटातून राष्ट्रवादी काँग्रेसकडून पुरुषोत्तम पावडे निवडणूक लढवणार आहेत. या निवडणुकीत महाविकास आघाडीने सर्व पाचही गटांमध्ये मजबूत उमेदवार उभे केल्याने आघाडीने सुरुवातीपासूनच सरशी घेतल्याचे बोलले जात आहे. यापूर्वी झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकीत सेलू तालुक्यातील पाच गटांपैकी एक गट शिवसेनेचा तर चार गट राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांनी जिंकले होते. यावेळीही एक उमेदवार 'मशाल' चिन्हावर तर चार उमेदवार 'घड्याळ' या चिन्हावर निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. या रणांगणात महाविकास आघाडीला कितपत यश मिळते, हे निकालानंतरच स्पष्ट होणार आहे. दरम्यान, तालुक्यातील राजकीय वर्तुळात एक वेगळीच चर्चा रंगली असून, पाचही जिल्हा परिषद गटांमध्ये सर्वच उमेदवार 'घड्याळ' या चिन्हावर निवडणूक लढवू शकतात, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. असे झाल्यास शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार राम खराबे पाटील हेही 'मशाल'ऐवजी 'घड्याळ' हे चिन्ह हातात बांधतील, अशी चर्चा तालुक्यातील जाणकारांमध्ये सुरू आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

**तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.**

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# सरकारचा निधी हा जनतेचा आहे कुणाच्या बापाचा नाही

## आमदार राहुल पाटील यांचा पत्रकार परिषदेत सरकारवर हल्ला, पुढील नियोजन लवकरच होणार

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी महानगरपालिकेच्या निवडणूकीत जनशक्तीने धनशक्तीवर मात करीत शिवसेना उबाठा व काँग्रेसला मोठे मताधिक्य मिळवून दिले आहे. स्पष्ट बहुमत या आघाडीला मिळालेले असल्यामुळे आघाडीच महापालिकेत निर्विवाद सत्ता स्थापन करणार आहे, असा विश्वास या दोन्ही पक्षाच्या नेतेमंडळींनी शनिवारी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

खासदार संजय जाधव, आमदार डॉ. राहुल पाटील, माजी आमदार सुरेश देशमुख यांच्यासह प्रमुख पदाधिकाऱ्यांनी अक्षदा मंगल कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत मनपात सत्ता स्थापनेचा दावा केला.

खासदार संजय जाधव म्हणाले, या विजयाचे श्रेय परभणीकरांना असून त्यांनी महाविकास आघाडीला भरभरुन प्रतिसाद देत स्पष्ट बहुमत दिले आहे. त्यामुळे सत्ता स्थापन करुन लोकहीतासाठी ही आघाडी काम करणार आहे. मात्र राज्य सरकारने या पालिकेला सवतीची वागणूक देवू नये. जिल्हा नियोजन समितीत सूत्रानुसार वाटा देवून जास्तीचा वाटा मनपासाठी द्यावा, अशी मागणी करीत पालकमंत्र्यांनी कटकारस्थान न करता आपण परभणीकर म्हणून शहराच्या विकासासाठी निधी देण्याचे काम करावे, असेही खासदार जाधव म्हणाले.

आमदार डॉ. राहुल पाटील यांनी धनशक्ती विरोधात जनशक्तीला दिलेला हा कौल असून त्यामुळेच क्रांतीची मशाल पेटली गेली आहे. खासदार जाधव हे पाच टर्मपासून तर आपण तीसऱ्या टर्ममध्ये आमदार म्हणून काम करीत असल्यामुळे निधी कसा खेचून आणायचा, हे आम्हाला माहित आहे. शासनाकडे जनतेचा पैसा असल्याने तो स्वतःची मालकी समजू नये. दुजाभाव न करता विकासासाठी निधी द्यावा, अशी मागणी करतांना भाजपने पराभव स्विकारावा असे आवाहनही केले. काँग्रेसचे माजी आमदार सुरेश देशमुख यांनी जनतेने काँग्रेस व उबाठा शिवसेनेला स्पष्ट बहुमत देतांना सत्ता स्थापनेचा आशिर्वाद दिला आहे. त्यामुळे ही सत्ता निर्विवादपणे स्थापन करुन निश्चितच शहराच्या विकासासाठी आघाडी काम करेल, अशी ग्वाही दिली.



पत्रकार परिषदेस जिल्हा प्रमुख गंगाप्रसाद आनेराव, प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ हत्तीअंबीरे, शिवसेना महानगर प्रमुख डॉ. विवेक नावंदर, महिला जिल्हा प्रमुख अंबिका डहाळे, काँग्रेसचे माजी उपमहापौर भगवान वाघमारे, माजी उपमहापौर माजुलाला, सय्यद कादर, मुजाहीद खान, रविराज देशमुख, नदीम इनामदार, सूर्यकांत हाके, शिवसेना उपजिल्हाप्रमुख संजय गाडगे, सदाशिव देशमुख, तालुका प्रमुख नंदकुमार आवचार, संदीप झाडे, सुभाष जोंधळे, शहर प्रमुख ज्ञानेश्वर पवार, विशु डहाळे, बाळराजे तळेकर आदींची उपस्थिती होती.

**सत्तेचे सूत्र ठरेल..**

काँग्रेस व उबाठा शिवसेना या आघाडीत शिवसेनेला सर्वाधिक २५ जागा मिळालेल्या आहेत. काँग्रेसला १२ जागा आहेत. त्यामुळे सत्ता स्थापन करतांना महापौर, उपमहापौर व स्थायी समिती सभापती या बाबत दोन्ही पक्षाची नेतेमंडळी संयुक्तपणे निर्णय घेईल. यामध्ये खासदार संजय जाधव यांची भूमिका महत्वपूर्ण ठरेल, असेही आमदार डॉ. राहुल पाटील यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

**जिल्हा परिषद निवडणुकीची घेतली बैठक**

परभणी जिल्हा परिषद निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गटाने तयारी जोरदार सुरू केली आहे. आजच्या कार्यक्रमात त्यांनी परभणी विधानसभा मतदार संघातील पदाधिकाजयांची आढावा बैठक घेतली. यावेळी गटनिहाय उमेदवारी बाबत चर्चा करण्यात आली.

## डॉ. जगदीश शिंदे यांचा काँग्रेस पक्षात प्रवेश

**पाथरी,/प्रतिनिधी :** सामाजिक कार्यकर्ते तसेच प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. जगदीश शिंदे यांनी आज शनिवार १७ जानेवारी रोजी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार बाबाजानी दुर्रानी यांच्या निवासस्थानी काँग्रेस पक्षात अधिकृत प्रवेश केला.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती शामराव धर्मे, जिल्हा परिषदेचे माजी सभापती सुभाष आबा कोल्हे, माजी पंचायत समिती सदस्य नारायणराव आढाव, दिनेश रनेर आदी मान्यवर उपस्थित होते.



दरम्यान, बाभळगाव जिल्हा परिषद गट हा महिला सर्वसाधारणसाठी राखीव आहे. या गटातून माजी सभापती सुभाषराव कोल्हे इच्छुक होते. मात्र वाढते वय लक्षात घेता त्यांनी निवडणूक न लढविण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे. त्यांच्या चिरंजीव अनिल कोल्हे हे कान्सूर गणातून निवडणूक रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. बाभळगाव गटातून डॉ. जगदीश शिंदे यांच्या मातोश्री काँग्रेस पक्षाकडून जिल्हा परिषद निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याचे सांगितले जात आहे. तसेच बाभळगाव गणातून उमेदवार निश्चित करण्यासाठी चाचपणी सुरू असल्याची माहिती आहे.

एकूणच काँग्रेस पक्षाकडून कासापुरी, लिंबा, बाभळगाव व देवनांद्रा या चारही गटांमध्ये नवतरुणांना संधी देण्यात आल्याने येथील उमेदवार भरघोस मतांनी विजयी होतील, असा विश्वास काँग्रेस कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे. डॉ. जगदीश शिंदे यांच्या काँग्रेस प्रवेशामुळे पक्षातील तरुण कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, काँग्रेस पक्षाला जिल्ह्यात आलेली मरगळ दूर करून पक्षाला पुन्हा एकदा जिल्ह्यात अग्रस्थानी नेण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे माजी आमदार बाबाजानी दुर्रानी यांनी जिल्हाध्यक्षपद स्वीकारल्यानंतर स्पष्ट केले होते. त्याच भूमिकेतून नवतरुणांना संधी देत स्वच्छ चारित्र्याची आणि सक्षम नवी फळी उभारण्याचे काम ते करीत असल्याचे दिसून येत आहे.

### जिल्हा परिषद निवडणूकीसाठी यंत्रणा झाली सज्ज

**परभणी,/प्रतिनिधी- परभणी जिल्हा परिषदेकरिता दिनांक ५ पेब्रुवारी रोजी मतदान होणार असून ७ पेबुवारी रोजी मतमोजणी होणार आहे. यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी दि.१६ जानेवारी पासून सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे लवकरच पुन्हा एकदा परभणी जिल्हा निवडणूकीसाठी सामोरे जावे लागणार असल्यामुळे आता पुन्हा एकदा नव्याने ही निवडणूकीकरिता प्रशासन सज्ज झालेले दिसत आहे.**

## वालूर येथील हत्याकांडातील अट्टल गुन्हेगार 'बाबुशा' गजाआड

**सेलू,/प्रतिनिधी :** तालुक्यातील वालूर येथील मंदिर परिसरात घडलेल्या निर्घृण हत्याकांडाचा अखेर छडा लागला. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार असलेल्या अट्टल गुन्हेगाराला स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली. आरोपी बाबुराव ऊर्फ बाबुशा सावळ्या पवार (वय ६०, रा. पिटोरी शिरसगाव, ता. अंबड, जि. जालना) या सराईत गुन्हेगाराने आपल्या इतर दोन साथीदारांच्या मदतीने यासह अन्य गुन्हे केल्याची कबुली दिली.

दिवाळीच्या सुट्टीदरम्यान वालूर येथील मंदिर परिसरात एका निष्पाप मुलाची डोक्यात वार करून निर्घृण हत्या करण्यात आली होती. त्याचवेळी एका महिला व पुरुषाला बेदम मारहाण करून त्यांच्याकडील मौल्यवान वस्तू लुटण्यात आल्या होत्या. या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.या प्रकरणाची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तपासाचे आदेश दिले होते.

गुन्ह्यानंतर आरोपी पोलिसांना गुंगारा देण्यासाठी वस्तीपासून दूर शेतात लपून राहत असल्याची माहिती मिळाली. स्थानिक गुन्हे शाखेने तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदारांच्या मदतीने आरोपीचा माग काढत १५ जानेवारी रोजी त्याला अटक केली. ही कारवाई अप्पर पोलीस अधीक्षक सूरज गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील, सहायक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप, चंद्रसिंह परिहार तसेच पथकातील मधुकर चट्टे, सुग्रीव केंद्रे, निलेश भुजबळ, विलास सातपुते, किशोर लटपटे, रणजित आगळे व इतर अंमलदारांनी यशस्वी केली.

## जवळा येथे माधवराव पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतून पशुवैद्यकीय चिकित्सा शिबिर

**शांतीलाल शर्मा**
**पालम,/प्रतिनिधी-**
जवळा:माधवराव पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराअंतर्गत दिनांक १४ जानेवारी रोजी जवळा गावामध्ये पशुवैद्यकीय चिकित्सा व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमास परिसरातील पशुपालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात डॉ. झाकीर अली व त्यांच्या तज्ज्ञ चमूने गायी, म्हशी, शेळ्या तसेच इतर पशुधनांची सखोल तपासणी केली. पशुधनाच्या आरोग्याबाबत आवश्यक औषधोपचार, प्रतिबंधात्मक उपाययोजना व मार्गदर्शन पशुपालकांना करण्यात आले. या उपक्रमामुळे पशुपालकांमध्ये पशुधन आरोग्याविषयी जनजागृती निर्माण झाली.
या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यक्रमाधिकारी डॉ. कालिदास गुडदे,डॉ. मोहन डमरे,डॉ. शिवाजी पौळ तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सकाळपासून संपूर्ण शिबिराची व्यवस्था, नोंदणी व पशुपालकांना सहकार्य करत मोलाचे योगदान दिले. या पशुवैद्यकीय चिकित्सा शिबिरात ५० पेक्षा अधिक पशुपालकांनी सहभाग नोंदवून आपल्या पशूंची तपासणी करून घेतली.
पशुपालकांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत महाविद्यालयाच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले.
समाजातील गरजा ओळखून उपयुक्त उपक्रम राबविण्याची माधवराव पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेची परंपरा या शिबिरातून पुन्हा एकदा अधोरेखित झाली असून,ग्रामीण विकासात शैक्षणिक संस्थांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे या उपक्रमातून स्पष्ट झाले.



## आघाडीचा हा मोठा विजय जनतेला समर्पित

### काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी आमदार सुरेश देशमुख यांची प्रतिक्रिया

**परभणी,/प्रतिनिधी :** राज्याचे मुख्यमंत्री व प्रदेशाध्यक्ष यांच्या दौऱ्यासह जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी मनपा निवडणूकीत अक्षरशः पायाला भिंगरी लावून प्रचार केला खरा परंतु, सर्वसामान्य नागरीकांनी काँग्रेस व शिवसेना उबाठा आघाडीस मोठा कौल दिला. त्यामुळेच आघाडीचा हा मोठा विजय आम्ही जनतेला समर्पित करीत आहोत, अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी आमदार सुरेशदादा देशमुख यांनी व्यक्त केली.

या निवडणूका भारतीय जनता पार्टीने गांभीर्याने घेतल्या होत्या. राज्याचे मुख्यमंत्री यांचा दौरा, राज्याचे महसुल मंत्री यांचा तीन वेळा दौरा तसेच प्रदेशाध्यक्षांचाही दौरा तसेच या जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी पायाला भिंगरी लावून प्रचार केला. परंतु, सर्वसामान्य नागरीकांनी मतदानातूनच आघाडीस कौल दिला. त्यामुळे या सर्वसामान्य नागरीकांचे आम्ही सर्व आघाडीचे नेतेमंडळी निश्चितच आभारी आहोत. त्यांच्या ऋणात राहणार आहोत. या महापालिकेत आघाडीचाच महापौर होणार आहे. विशेषतः लोकांच्या मनातलाच महापौर होईल, आम्ही सर्वजन एकमेकांच्या सोबत आहोत, असे ते म्हणाले.

मतदानाच्या टप्प्यात भारतीय जनता पार्टीने एकदा नव्हे, चार-चार वेळा रिकाऊंटींगचा आग्रह धरला, परंतु शेवटी सत्याचाच विजय झाला. लोकशाहीचा विजय झाला, असे ते म्हणाले.



## दुचाकीच्या समोरासमोर धडकेत एकाचा मृत्यू, तीघे गंभीर

**परभणी,/प्रतिनिधी:** सोनपेठ ते गंगाखेड या रस्त्यावरील सायखेडा शिवारात दोन मोटारसायकलच्या समोरासमोर धडकेत एका युवकाचा मृत्यू झाला. तर अन्य तिघे जखमी झाले. ही दुर्देवी घटना शनिवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास घडली.

एम.एच. २२ ए.जे. ५७३० या मोटारसायकलवर दोघे खडका येथून शेळगावकडे तर एम.एच. ३८ एच. ९७४६ या मोटारसायकलवरुन अन्य दोघे जात होते. सायखेडा शिवारात गणपती मंदिराजवळ या दोन्ही मोटारसायकलची समोरासमोर जोरदार धडक झाली. त्यात महेश अशोक यादव (रा.खडका) या २४ वर्षीय युवकाचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. तर अतूल रामेश्वर यादव, सोमनाथ जोगदंड व सुभाष पाचंगे हे तीघे जखमी झाले. जखमींवर परभणी आणि अंबाजोगाई येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

# तेरखेडा जिल्हा परिषद गटात केशव सावंत की विकी चव्हाण; तिकीट कुणाच्या गळ्यात, 'घड्याळा'ची एन्ट्री होणार का?




**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१७ जानेवारी -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील पारा-पारगाव-तेरखेडा जिल्हा परिषद गट यंदाच्या निवडणुकीत सर्वाधिक चर्चेत आला असून, मिनी मंत्रालय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीत मोठा राजकीय भूकंप होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख जवळ येत असताना उमेदवारांची धावपळ वाढली आहे, मात्र पक्षांतील अंतर्गत तिढा अद्याप सुटलेला नाही. पारगाव आणि पारा हे दोन्ही गट महिला राखीव असून तेरखेडा जिल्हा परिषद गट खुला सुटल्याने येथे निर्णायक आणि अत्यंत लक्षवेधी लढत होणार आहे.

## शिंदे गटात बंडाची ठिणगी; खामकर बाहेर पडणार का?

सध्या या गटात शिवसेना शिंदे गट विरुद्ध अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस असा थेट सामना रंगण्याची शक्यता असून, बैठका, कार्यकर्त्यांची पळापळ आणि मतदारसंघात गाड्यांची गर्दी वाढल्याने राजकीय वातावरण तापले आहे. शिंदे गटाकडून केशव सावंत, विकी चव्हाण आणि बिभीषण खामकर हे तिन्ही दिग्गज नेते उमेदवारीसाठी इच्छुक असून तिघेही आपापल्या ताकदीवर मैदानात उतरले आहेत.

दरम्यान, बिभीषण खामकर नाराज असल्याची जोरदार चर्चा असून उमेदवारीबाबत स्पष्ट संकेत न मिळाल्याने ते अस्वस्थ असल्याचे बोलले जात आहे, त्यामुळे ते शिंदे गटाला जय महाराष्ट्र करणार का? की वरिष्ठ नेते त्यांची मनधरणी करतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या सगळ्या घडामोडींमध्ये केशव सावंत की विकी चव्हाण हा प्रश्न केंद्रस्थानी आला असून विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत आमदार तानाजी सावंत यांच्या विजयासाठी सर्वाधिक लीड मिळवून देण्यात विकी चव्हाण यांचे मोठे योगदान होते अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे, त्यामुळे शेवटी तिकीट विकी चव्हाण यांना दिले जाईल अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे अजित पवार गटाचा उमेदवार अद्याप पडद्याआडच असून योग्य टायमिंग साधून नाव जाहीर करण्याची रणनिती आखली जात असल्याची माहिती आहे, याच पार्श्वभूमीवर नाराज खामकर शिंदे गटाची साथ सोडून घड्याळ हाती घेऊन राष्ट्रवादीकडून थेट विरोधी उमेदवार म्हणून मैदानात उतरतील का याचीही जोरदार चर्चा सुरू आहे.

दरम्यान आ. तानाजी सावंत यांनी वाशी तालुक्यातील तेरखेडा जि.प गटातील इंदापूर येथील १३ वर्षांपासून बंद असलेला नरसिंह साखर कारखाना भैरवनाथ समूहाकडे घेतल्याने परिसरातील शेतकरी, ऊसतोड मजूर आणि व्यावसायिकांमध्ये नव्या अपेक्षा निर्माण झाल्या असून या मुद्द्याचा थेट परिणाम निवडणुकीवर होऊ शकतो.

एकंदरीत नाराजी, बंडखोरी, गुप्त रणनिती, केशव-विकी संघर्ष आणि शिंदे-राष्ट्रवादी सामना यामुळे तेरखेडा जिल्हा परिषद गटाची निवडणूक धाराशिव जिल्ह्यातील सर्वात रंगतदार, चर्चेची आणि निर्णायक ठरणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

### संक्षिप्त वृत्त...



## समरजितसिंह ठाकूर यांचा रुपामाता परिवाराच्या वतीने सत्कार

**धाराशिव, दि.१७ जानेवारी -**

परंडा नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी समरजितसिंह ठाकूर यांची निवड झाल्याबद्दल परंडा येथे त्यांचा औपचारिक सत्कार करण्यात आला. मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांचे सुपुत्र असलेल्या समरजितसिंह ठाकूर यांनी जनशक्ती नगर विकास आघाडीचे उमेदवार म्हणून ही जबाबदारी स्वीकारली आहे. याप्रसंगी रुपामाता उद्योग समूहाचे चेअरमन व भाजपाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. व्यंकटराव गुंड-पाटील (रुपामाता परिवार, धाराशिव) तसेच जिल्हा परिषद, धाराशिवचे माजी उपाध्यक्ष सुधाकर गुंड (गुरुजी) यांनी समरजितसिंह ठाकूर यांची सदिच्छा भेट घेत पुष्पहार अर्पण करून अभिनंदन केले. त्यांच्या भावी राजकीय व सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा व आशीर्वाद व्यक्त करण्यात आले. यावेळी ॲड. गुंड-पाटील यांनी उपनगराध्यक्षपदाच्या माध्यमातून परंडा शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## नळदुर्ग नगरपालिकेच्या स्वीकृत सदस्यपदी सुधीर पोतदार यांची निवड

**नळदुर्ग, दि.१७ जानेवारी -**

नळदुर्ग नगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाने नेते अशोक जगदाळे यांच्या नेतृत्वाखाली २० पैकी ९ जागा जिंकत भक्कम उपस्थिती नोंदवली आहे. दि.१६ जानेवारी रोजी पार पडलेल्या उपनगराध्यक्ष व स्वीकृत सदस्यांच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाकडून स्वीकृत सदस्यपदासाठी जगदाळे समर्थक व सुधीर पोतदार यांना उमेदवारी देण्यात आली होती. या निवडणुकीत सुधीर पोतदार यांची नळदुर्ग नगरपालिकेच्या स्वीकृत सदस्यपदी निवड जाहीर झाली. सामाजिक बांधिलकी, निर्भीड पत्रकारिता आणि जनहितासाठी केलेले कार्य ही त्यांची ओळख असून, स्वीकृत सदस्यपदी निवड झाल्याने शहरवासीयांकडून त्यांचे स्वागत व अभिनंदन करण्यात येत आहे.



## तालुका विधिज्ञ मंडळ निवडणुकीत ॲड. जयवंत इंगळे अध्यक्षपदी विजयी

**तुळजापूर, दि.१७ जानेवारी -**

तुळजापूर तालुका विधिज्ञ मंडळ यांच्या निवडणुकीत ॲड. जयवंत इंगळे यांच्या पॅनलने दणदणीत विजय मिळवला. अध्यक्ष पदासाठी झालेल्या निवडणुकीत ॲड. जयवंत शिवाजीराव इंगळे यांना ८७ मते मिळाली, तर विरोधक ॲड. विवेक हिरोळीकर यांना ५९ मते पडली. एकूण मतदान १४८ झाले असून, २८ मतांनी ॲड. इंगळे विजयी झाले. उपाध्यक्ष पदासाठी ॲड. अंजली साबळे बिनविरोध निवडून आल्या. निवडणुकीत ॲड. टी.बी. जगताप निवडणूक अधिकारी, तसेच सहाय्यक अधिकारी ॲड. बालाजी देशमाने, ॲड.एस.एल. कापसे, ॲड.एस.बी. गायकवाड, ॲड. दिपक हुंडेकर, ॲड. हंगरगेकर यांनी काम पाहिले.

## अवैध मद्यसाठा जप्त, गुन्हा दाखल

**धाराशिव, दि.१७ जानेवारी -**

धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत अंबेजवळगे-सोनेगाव रोडच्या बाजूला कारवाई करण्यात आली. या कारवाईत भिमराव गोफणे याच्याकडून अवैध विक्रीच्या उद्देशाने ठेवलेल्या देशी-विदेशी दारूच्या २० सिलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या.

## मुरूम येथे नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.१७ जानेवारी -**

मुरूम येथील नगर शिक्षण मंडळ अंतर्गत असलेल्या नूतन प्राथमिक शाळेच्या वतीने नवनिर्वाचित नगराध्यक्ष व भारतीय जनता पार्टीचे नेते बापुराव पाटील तसेच नवनिर्वाचित नगरसेवक व नगरसेविकांचा सत्कार सोहळा शनिवारी उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नूतन प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक राजशेखर कोरे होते. यावेळी युवानेते शरण पाटील, उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण, नगर शिक्षण मंडळाचे सचिव व्यंकटराव जाधव, संचालक राजेंद्र भोसगे, पालिका गटनेते गणेश अंबर, नगरसेवक गौस शेख, रूपचंद गायकवाड, राजेंद्र बेंडकाळे यांच्यासह सर्व नगरसेवक व नगरसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रसंगी युवानेते शरण पाटील, प्रतिभा निकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य उल्हास गुरगुरे तसेच मुख्याध्यापक इरफान मुजावर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप राजशेखर कोरे यांनी केला.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक बळीराम गंगणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रेमनाथ आपचे यांनी मानले. या सत्कार सोहळ्यास शहर व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## शेतीत वाटेकरी होऊ नये म्हणून अल्पवयीन मुलाकडून वडिलांचा खून

### मानेवाडी येथे धक्कादायक घटना...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१७ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील मानेवाडी येथे शेतीत दुसरा वाटेकरी होऊ नये, या संशयातून १७ वर्षीय अल्पवयीन मुलाने आपल्या वडिलांच्या डोक्यात दगड घालून खून केल्याची धक्कादायक घटना दि. १६ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, याप्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, मानेवाडी ता. तुळजापूर येथील महीपती आंबाजी सुरवसे (वय ४५) यांनी पहिल्या पत्नीच्या निधनानंतर इराप्पा या महिलेशी दुसरा विवाह केला होता. पहिल्या पत्नीपासून त्यांना धुळप्पा हा मुलगा आहे. वडिलांनी दुसरा विवाह केल्यानंतर सावत्र आई इराप्पा हिचे कुटुंबनियोजनचे ऑपरेशन न केल्याने, भविष्यात अपत्य होऊन शेतीत दुसरा वाटेकरी निर्माण होईल, असा संशय धुळप्पा याच्या मनात होता. याच कारणावरून तो वडिलांवर राग धरून होता.




दि.१६ जानेवारी रोजी सकाळी सुमारे ६ वाजता धुळप्पा हा अणदुर शिवारातील चिकणी तांडा येथील शेतात गव्हाला पाणी देण्यासाठी गेला होता. त्यानंतर दुपारी त्याचे वडील महीपती सुरवसे हे त्याच्यासाठी जेवणाचा डबा घेऊन शेतात गेले. सायंकाळी सुमारे ५.३० वाजण्याच्या सुमारास वडील-मुलामध्ये वाद झाला. या वादातून संतप्त झालेल्या धुळप्पा याने वडिलांच्या डोक्यात दगड घालून त्यांचा खून केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी लक्ष्मीबाई आंबाजी सुरवसे यांनी नळदुर्ग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक सचिन यादव यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. आरोपी अल्पवयीन असल्याने त्याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे. घटनास्थळी अप्पर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, तसेच पोलीस निरीक्षक सचिन यादव आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक सोळुंके यांनी भेट दिली.

या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात आरोपी धुळप्पा महीपती सुरवसे (वय १७) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक सचिन यादव हे करीत आहेत.

## परंड्यात विनापरवाना तलवार बाळगल्याप्रकरणी एकावर गुन्हा दाखल

**परंडा, दि.१७ जानेवारी -**

परंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा प्रकारे विनापरवाना लोखंडी तलवार बाळगल्याप्रकरणी एका व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी जनार्धन गोरवे (वय ३६, रा. कौडगाव, ता. परंडा) यास दि.१६ जानेवारी रोजी सकाळी १०.३० वाजता कौडगाव येथील बसस्थानक चौकात बेकायदेशीररित्या सुमारे ५०० रुपये किंमतीची लोखंडी तलवार जवळ बाळगताना परंडा पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिस पथकाने सदर तलवार जप्त केली असून, फिर्यादी राहुल चतुर्भुज खताळ यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरून आरोपीविरुद्ध शस्त्र कायद्यानुसार तसेच मपोका कलम १३५ अन्वये परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने नुतन नगराध्यक्ष, नगरसेवक व पत्रकारांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१७ जानेवारी -**

नळदुर्ग शहरातील वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने दि. १७ जानेवारी रोजी नळदुर्ग नगरीचे नुतन नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, सर्व नगरसेवक तसेच शहरातील पत्रकारांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.



नळदुर्ग शहरातील मल्लिकार्जुन मंदिराच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमास नगराध्यक्ष बसवराज धरणे, उपनगराध्यक्ष नय्यरपाशा जागीरदार, भाजपचे नगरपालिकेतील गटनेते दत्तात्रय दासकर, उपगटनेते तानाजी जाधव, काँग्रेसचे गटनेते मारुती खारवे, उपगटनेते आकाश कुलकर्णी यांच्यासह नगरसेवक सुधीर पोतदार, पांडुरंग पुदाले, निरंजन राठोड, रीजवान काजी, इमाम शेख, अब्दुल गफूर कुरेशी, प्रविण गायकवाड तसेच नगरसेविका मिनाक्षी काळे, राणी सुरवसे, अपर्णा बेडगे, सुमनबाई ठाकुर, कमलबाई गायकवाड उपस्थित होते.

यावेळी ॲड. अरविंद बेडगे, ॲड. धनंजय धरणे, किशोर नळदुर्गकर यांच्यासह पत्रकार सुहास येडगे, विलास येडगे, उत्तम बनजगोळे, दादासाहेब बनसोडे, आयुब शेख, अजित सुरवसे यांचा वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

सध्या शहरातील पाण्याचा प्रश्न गंभीर असून आठ दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. यामध्ये सुधारणा करून किमान तीन दिवसाआड पाणीपुरवठा व्हावा, अशी मागणी त्यांनी केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वीरशैव लिंगायत समाजाचे सल्लागार व माजी नगरसेवक दत्तात्रय कोरे यांनी केले.

## मंगरुळ येथे एकाच रात्री पाच ठिकाणी सलग चोरी

### परिसरात भीतीचे वातावरण

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.१७ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथे गुरुवार, दि.१५ जानेवारी रोजी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घालत चार पान टपऱ्या व एका बिअर शॉपीवर सलग चोरी केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. या घटनेत चोरट्यांनी शटर फोडून हजारो रुपयांची रोकड, साहित्य व बिअर लंपास केल्याने मंगरुळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, तुळजापूर-अक्कलकोट मुख्य रस्त्यालगत असलेल्या व्यावसायिक आस्थापनांनाच चोरट्यांनी लक्ष्य केले. येथील शंकर जांभळे, विक्रम हजारे, दिलीप धूरगुडे व संजय राजमाने यांच्या पान टपऱ्या तसेच अमर लबडे यांची बिअर शॉपी अशा एकूण पाच ठिकाणी चोरट्यांनी एकाच रात्री निर्भयपणे हात साफ केला.




मध्यरात्रीच्या सुमारास लोखंडी हत्यारांच्या सहाय्याने शटरची कुलपे तोडण्यात आली. प्रत्येक पान टपरीतून अंदाजे चार ते पाच हजार रुपयांची रोकड, सिगारेट, गुटखा, तंबाखू आदी साहित्य चोरट्यांनी लंपास केले. तसेच बिअर शॉपीमधून १५ ते २० बिअरच्या बाटल्या व रोख चिल्लर रक्कम चोरीस गेली आहे. प्राथमिक अंदाजानुसार ही चोरी चार ते पाच अज्ञात चोरट्यांनी केल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सकाळी नेहमीप्रमाणे दुकाने उघडण्यासाठी आले असता शटर तुटलेल्या अवस्थेत दिसताच व्यावसायिकांची एकच धावपळ उडाली. काही वेळातच ही माहिती वाऱ्यासारखी पसरली आणि ग्रामस्थ घटनास्थळी जमा झाले. एकाच रात्री पाच ठिकाणी झालेल्या चोरीमुळे लहान व्यावसायिक आर्थिक संकटात सापडले असून त्यांची रोजीरोटी धोक्यात आली आहे. मंगरुळ गावात अलीकडच्या काळात चोरीच्या घटनांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. यापूर्वीही शेतकऱ्यांचे पीक, जनावरे तसेच शेतीसाठी लागणारे साहित्य चोरीस गेल्याच्या घटना घडल्या आहेत. मात्र, त्या प्रकरणांचा आजपर्यंत ठोस छडा लागलेला नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. चोरट्यांना कोणाचीही भीती उरलेली नाही.

रात्रीच्या वेळी पोलीस गस्त नसल्याचा गैरफायदा घेत हे प्रकार वाढत आहेत, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिक नागरिक व्यक्त करीत आहेत. चोरीच्या घटना वारंवार घडत असतानाही दोषींवर कारवाई होत नसल्याने पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. या घटनेनंतर ग्रामस्थांनी रात्रीची पोलीस गस्त वाढवावी, संशयितांवर बारकाईने नजर ठेवावी, तसेच परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी करून चोरट्यांचा तातडीने शोध घ्यावा, अशी जोरदार मागणी केली आहे. लहान व्यावसायिकांनीही सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आणत प्रशासनाकडे ठोस उपाययोजना राबविण्याची मागणी केली आहे.

दरम्यान, या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून घटनास्थळी पाहणी करण्यात येत आहे. मात्र, एकाच रात्री पाच ठिकाणी घडलेली ही चोरी पोलिसांसाठी मोठे तपासाचे आव्हान ठरणार असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

## सहाव्या पंधरवाड्यातील ऊस बिल शेतकऱ्यांच्या खात्यात जमा : चेअरमन पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ जानेवारी -**

सहाव्या पंधरवाड्यात आलेल्या ऊसाचे ४ कोटी ६२ लाख ५५ हजार ७३७ रुपये इतके बिल शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आल्याची माहिती एनव्हीपी शुगरचे चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी दिली.

तालुक्यातील जागजी शिवारातील एनव्हीपी शुगरच्या वतीने चाचणी गळीत हंगामापासून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अवघ्या पंधरा दिवसांत ऊसाचे बिल अदा करण्याची परंपरा सुरू करण्यात आली आहे. द्वितीय गळीत हंगाम २०२५-२६ मधील सहाव्या पंधरवाड्यात १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२६ या कालावधीत ऊस पुरवठा केलेल्या सर्व शेतकऱ्यांचे बिल प्रति टन २७०० रुपये दराने दि.१६ जानेवारी २०२६ रोजी थेट संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांनी उस्मानाबाद जनता सहकारी बँकेचे खाते दिले आहे, त्यांनी बँकेत जाऊन आपले बिल घ्यावे. तसेच ज्यांनी खाते दिलेले नाही, अशा शेतकऱ्यांनी पवनराजे लोकसमृद्धी मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., धाराशिव येथे जाऊन आपले बिल घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

यावेळी चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी कारखान्यास ऊस देऊन सहकार्य करावे, असे आवाहन केले.

## संक्षिप्त वृत्त...




### स्वामी विवेकानंद शाळेत सामुदायिक तिळगूळ वाटप

**उमरगा, दि.१७ जानेवारी**

उमरगा येथील स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर येथे मकर संक्रांतीनिमित्त इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना सामुदायिक तिळगूळ वाटप करण्यात आले. हा उपक्रम मुख्याध्यापिका सविता लोहार यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकांच्या हस्ते पार पडला. शाळेच्या वतीने दरवर्षी मकर संक्रांतीच्या पावन पर्वानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना सामुदायिक स्वरूपात तिळगूळ वाटप करून सणाचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले जाते. यावेळी सहशिक्षक व्यंकट वचणे यांनी मकर संक्रांतीचे भारतीय समाजातील सांस्कृतिक व सामाजिक महत्त्व विद्यार्थ्यांना सोप्या शब्दांत समजावून सांगत मार्गदर्शन केले. कार्यक्रम आनंदी व उत्साही वातावरणात संपन्न झाला.

### मद्यधुंद अवस्थेत ट्रक चालविणाऱ्या चालकावर गुन्हा दाखल

**लोहारा, दि.१७ जानेवारी**

लोहारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविल्याप्रकरणी एका ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




आरोपी बद्रोद्दीन वाजीदअली शेख (वय ५५, रा. हिमाल नगर, राजेश्वर, ता. जि. बिदर, कर्नाटक) हा दि.१५ जानेवारी रोजी सायंकाळी ७.१५ वाजता आपल्या ताब्यातील ट्रक क्रमांक K-५६-८८२९ हा लोकमंगल कारखाण्याजवळ, लोहारा बु. येथे मद्यधुंद अवस्थेत चालवत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. याप्रकरणी आरोपीने मोटार वाहन कायदा कलम १८५ चे उल्लंघन केल्याने, पोलिसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरून आरोपीविरुद्ध लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास लोहारा पोलीस करीत आहेत.

# परंड्यात उधार दारू न दिल्याने बारमध्ये हाणामारी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ जानेवारी -**

दारू उधार देण्याच्या कारणावरून वाद घालत चौघांनी मिळून एकाला लाथाबुक्क्यांनी आणि बिअरच्या क्रेटने मारहाण केल्याची घटना परंडा शहरातील लोकप्रिय बिअर बारमध्ये घडली आहे. याप्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात चौघांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी की, आरोपी विश्वास उर्फ बापु अंकुश भानवसे, अशोक मच्छिंद्र




भानवसे, महेश मच्छिंद्र भानवसे व रोहित विश्वास भानवसे (सर्व रा. काशीमबाग, परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव) यांनी दि.१४ जानेवारी रोजी सायं. ७ वाजण्याच्या सुमारास परंडा येथील लोकप्रिय बियरबार येथे फिर्यादी बत्तीनी लक्ष्मण गौड (वय ४९, रा. नरसिंग नगर, परंडा) यांच्यावर हल्ला केला.

फिर्यादीनुसार, दारू उधारीच्या कारणावरून वाद झाल्यानंतर आरोपींनी शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी तसेच कॅरेट व काठीने मारहाण करून फिर्यादीस गंभीर जखमी केले. तसेच जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी फिर्यादी बत्तीनी गौड यांनी दि.१६ जानेवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास परंडा पोलीस करत आहेत.

# नारंगवाडी येथे धाब्याच्या शेडमध्ये चोरी; २० हजार ५०० रुपयांचा माल लंपास

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१७ जानेवारी -**

उमरगा तालुक्यातील नारंगवाडी येथे अज्ञात चोरट्यांनी धाब्याच्या पत्र्याच्या शेडमध्ये घुसखोरी करून तांदूळ, किराणा साहित्य व बकरे असा एकूण २० हजार ५०० रुपयांचा माल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

याबाबत फिर्यादी शंकर दामु मुगळे (वय ४०, रा. नारंगवाडी, ता. उमरगा, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.१४ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजल्यापासून ते दि.१५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ६ वाजेपर्यंतच्या कालावधीत अज्ञात व्यक्तीने त्यांच्या धाब्याच्या पत्र्याच्या



शेडच्या पाठीमागील पत्रा कापून आत प्रवेश केला. यावेळी एक तांदळाचा कट्टा, 'किर्ती गोल्ड'चा एक डब्बा तसेच बकरे असा एकूण २०,५०० रुपयांचा माल चोरून नेण्यात आला. या प्रकरणी फिर्यादी शंकर मुगळे यांनी दि.१५ जानेवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास उमरगा पोलीस करीत आहेत.

# तुळजापूर येथील लॉजवरून महागडे कॅमेरे व आयफोन चोरीस

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१७ जानेवारी -**

तुळजापूर शहरातील दसरा एक्झिक्युटिव्ह लॉजवरून सुमारे ८ लाख ९४ हजार ८९५ रुपये किमतीचे कॅमेरे व मोबाईल चोरीस गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत तुळजापूर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, नागय्या बसय्या मंडी (वय ३१, रा. चक्रकट्टा हनुमंत मंदिराजवळ, गाजीपूर, कलबुर्गी, ता. कलबुर्गी) हे दि.१५ जानेवारी रोजी सायंकाळी ६.४५ ते ७ वाजण्याच्या दरम्यान तुळजापूर येथील दसरा एक्झिक्युटिव्ह लॉज येथे थांबले असताना, त्यांच्या मालकीचे मौल्यवान साहित्य चोरीस गेले.

चोरीस गेलेल्या साहित्यामध्ये कॅनन डिजिटल कॅमेरा EOS R5 MK II बॉडी, सोनी कॅमेरा मॉडेल ILCE-7M4/BQ (SR नं. ८४६२७७६), सिग्मा 85mm १.४ DG DN लेन्स, सिग्मा 50mm DG DN लेन्स, रिअर फिल्टर होल्डर RF 35mm F1.4 LVCM² केस, तसेच आयफोन यांचा समावेश आहे.

या प्रकरणात आरोपी म्हणून कार्तिक ए स. (रा. तिरुपती जिल्हा, सेलम राज्य, आंध्रप्रदेश) याचे नाव नमूद करण्यात आले आहे. फिर्यादीच्या तक्रारीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात दि.१६ जानेवारी रोजी गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पुढील तपास तुळजापूर पोलीस करीत आहेत.

# भाजप नगरसेवकांनी घेतले आई तुळजाभवानीचे आशीर्वाद

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१७ जानेवारी -**

भारतीय जनता पक्षाच्या जिल्ह्यातील नवनियुक्त नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व नगरसेवक यांनी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राची आराध्य दैवत आई तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले आणि तिचे आशीर्वाद प्राप्त केले.

या पवित्र दर्शनातून जिल्ह्यातील जनतेच्या सेवेसाठी, विकासासाठी आणि सुशासनासाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळाली. नुकत्याच पार पडलेल्या नगर पालिका निवडणुकीत भाजपला मिळालेल्या भरघोस जनसमर्थनला या उपस्थितींनी केवळ निवडणूक निकाल म्हणून नाही, तर जनतेने दिलेला ठाम विकासाचा आदेश म्हणून घेतले.

कार्यक्रमात बोलताना नवनिर्वाचित



नगरसेवकांनी सांगितले की, शहरांचा सर्वांगीण विकास, मूलभूत सुविधा, पारदर्शक प्रशासन, भ्रष्टाचारमुक्त कारभार आणि नागरिकांच्या समस्यांना प्राधान्य देणारी धोरणे ही जनतेची अपेक्षा असून, त्यासाठी भाजप नेतृत्वाखालील केंद्र व राज्य सरकारच्या लोकाभिमुख योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे ही आमची जबाबदारी आहे.

यावेळी मा.आ. सुजितसिंह ठाकूर, दत्ताभाऊ कुलकर्णी, नितीन काळे, मल्हार पाटील यांच्यासह भाजपाचे प्रमुख पदाधिकारी, नवनिर्वाचित नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक आणि असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# वाढदिवसाचा खर्च टाळून शाळेची रंगरंगोटी; आदर्श शिक्षिका वर्षा चौधरी यांचा प्रेरणादायी उपक्रम

**लोहारा, दि.१७ जानेवारी -**

लोहारा तालुक्यातील मार्डी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या आदर्श शिक्षिका वर्षा चौधरी यांनी वाढदिवसाचा खर्च टाळत संपूर्ण शाळेची रंगरंगोटी करून समाजासमोर एक प्रेरणादायी आदर्श उभा केला आहे. खर्चिक समारंभांऐवजी शाळेसाठी केलेली ही कृती शिक्षणाविषयीची आस्था, विद्यार्थ्यांप्रतीचे प्रेम आणि शिक्षकाची सामाजिक जबाबदारी अधोरेखित करणारी ठरली आहे.

या रंगरंगोटीमुळे शाळेचे रूप तर बदललेच, पण विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला असून शाळेबद्दलची आपुलकीही दृढ झाली आहे. ग्रामीण शाळांमधील मर्यादित सुविधा असतानाही ही शाळा माझीच आहे या भावनेतून केलेला हा उपक्रम ग्रामस्थांमध्ये विशेष कौतुकाचा विषय ठरला आहे. वर्षा चौधरी यांचा हा उपक्रम इतर शिक्षकांसाठी प्रेरणास्थान ठरत असून, शिक्षण हे आनंददायी आणि शाळा आपली वाटावी हा संदेश त्यांनी कृतीतून दिला आहे.

# काळनिंबाळा येथे 'शेतकरी शेती शाळा' संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१७ जानेवारी -**

वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट यांच्या आयोजनात आणि टाटा कम्युनिकेशनच्या अर्थसहाय्याने काळनिंबाळा येथे 'शेतकरी शेती शाळा' उत्साहात पार पडली.

कार्यक्रमाची सुरुवात खंडू पांढरे यांनी प्रास्ताविक करून केली. त्यांनी संस्थेची माहिती देत, राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थित शेतकऱ्यांना दिली. त्यानंतर विठ्ठल ढवळे यांनी नैसर्गिक संसाधनांच्या विकासाद्वारे ग्रामीण समुदायाचे सक्षमीकरण या प्रकल्पाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. यात सेंद्रिय शेती, फळबाग लागवड, महिला सक्षमीकरणासाठी उपजीविकेच्या संधी, पाणलोट विकास, तसेच ठिबक व तुषार सिंचन तंत्रज्ञानाचा वापर यांचा समावेश होता. शेतकऱ्यांना ऋीझीशलळीश ॲपच्या वापराबाबत मार्गदर्शनही करण्यात आले.

सेंद्रिय शेतीच्या प्रशिक्षणात माती परीक्षण, बियाण्यांची उगवण क्षमता तपासणी, योग्य पेरणी पद्धती, बीजप्रक्रिया, वेस्ट डीकंपोझर, ड-९ कल्चर, जीवामृत, दशपर्णी अर्क, पक्षीथांबे, सापळा पिके, निंबोळी अर्क, गांडूळ खत यांचा उपयोग स्पष्ट केला गेला. यासोबतच एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन व अन्नद्रव्य व्यवस्थापनाचे फायदे सांगितले गेले. कार्यक्रमाला सरपंच सत्यपाल सूर्यवंशी, सोम शंकर नवटाके, ज्ञानेश्वर बिराजदार, दयानंद स्वामी यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

याप्रसंगी लायकसिंग चव्हाण, रमेश टीकांबरे, संजय पाटील, माणिक कुंभार, गहिनीनाथ सुरवसे, ज्ञानेश्वर दासमे, शिवाजी कुंभार, मधुकर रानमळे, नागप्पा बडूरे, यशवंत बिराजदार, देविदास कुलकर्णी, मारुती कुडकल यांसह मोठ्या संख्येने शेतकरी बांधव सहभागी झाले.

# उपनगराध्यक्ष निवडणुकीत गुलाल उधळल्याचा कारणावरून परंड्यात हाणामारी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ जानेवारी -**

उपनगराध्यक्ष निवडणूकीच्या वेळी गुलाल उधळल्याच्या जुन्या कारणावरून एका व्यक्तीला काठीने गंभीर मारहाण केल्याची घटना परंडा शहरात घडली आह. याप्रकरणी एका विरोधात परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, आरोपी गौस उर्फ टॅगो मुक्तार शेख (रा. सिकलकर गल्ली, परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव) याने दि.१४ जानेवारी रोजी रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास कुर्डूवाडी रोडवरील शिवरत्न हॉटेल, परंडा येथे फिर्यादी कलीम उत्ताउर रहेमान मुजावर (वय ४८, रा. सोमवार गल्ली, परंडा) यांच्यावर



हल्ला केला.

फिर्यादीनुसार, उपनगराध्यक्ष निवडणुकीत गुलाल उधळण्याच्या कारणावरून वाद झाला. त्यानंतर आरोपीने शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी व काठीने मारहाण करून फिर्यादीस गंभीर जखमी केले. तसेच जीवे ठार मारण्याची धमकी दिली व मोबाईल फोन फोडून नुकसान केले.

या प्रकरणी फिर्यादी कलीम मजावर यांनी दि.१६ जानेवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास परंडा पोलीस करत आहेत.

## श्री श्री रविशंकर विद्यामंदिरमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१७ जानेवारी -**

उमरगा शहरातील श्री श्री रविशंकर विद्यामंदिर येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे वार्षिक स्नेहसंमेलन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. दीपा मोरे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून उमरगा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष किरण गायकवाड आणि नगरसेवक शफीभाई चौधरी उपस्थित होते. याप्रसंगी संस्थेचे संचालक डॉ. सुरेश चव्हाण, डॉ. उदय मोरे, प्रा. सुनंदा महाजन, डॉ. रेणुका मोरे यांनी प्रमुख उपस्थिती लाभली.

सेमी इंग्रजी व CBSE विभागातील विद्यार्थ्यांनी नृत्य, नाटिका व गीतांच्या माध्यमातून आपल्या सुप्त कलागुणांचे सादरीकरण केले. सामाजिक प्रबोधन, निसर्ग संवर्धन, देशभक्ती, संस्कार तसेच शेतकरी - जगाचा पोशिंदा या विषयावर आधारित नाटक आणि हिंदी-मराठी गीतांनी उपस्थित पालक व मान्यवरांचे लक्ष वेधले.विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांकडून भरभरून दाद मिळाली, आणि संपूर्ण परिसरातून कार्यक्रमाचे कौतुक होत होते. यांप्रसंगी अमृत मोरे, डिंगबर कुलकर्णी, सागर हिरानाथ, गणपत देवकर, माधुरी मडीवळे, संगमेश्वर केदारे, सचिन सूर्यवंशी, उमेश इंगोले, राजेंद्र पोतदार, सुधा भोसले यांच्या आदि उपस्थित होते.

# रुईभर येथे इंदिरा गांधी प्राथमिक शाळेतील चिमुकल्यांचा आनंद मेळावा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ जानेवारी -**

डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्था अंतर्गत येणाऱ्या इंदिरा गांधी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा आनंद मेळावा दि. १७ जानेवारी रोजी उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटन जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधावा या उद्देशाने हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात खेळ, कला, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच व्यावहारिक शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थ व वस्तूंचे स्टॉल्स उभारले होते. यामुळे त्यांना कमवा आणि शिका या संकल्पनेची ओळख झाली, आत्मविश्वास वाढला तसेच पालक व शिक्षक यांच्यातील समन्वय अधिक दृढ झाला.

अशा मेळाव्यांमधून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, व्यावहारिक ज्ञान आणि सृजनशीलतेला चालना मिळते.

हा मेळावा केवळ उत्सव न राहता, मुलांच्या उज्वल भविष्यासाठी आवश्यक कौशल्ये व मूल्ये शिकवणारा एक प्रभावी मंच ठरला. मेळाव्यात विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद स्पष्टपणे दिसून येत होता आणि संपूर्ण वातावरण अत्यंत उत्साही व दैदीप्यमान झाले होते. या मेळाव्यात सुमारे २५ हजार रुपयांची उलाढाल झाली.

या आनंद मेळाव्याचा आस्वाद घेण्यासाठी प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, श्री स्वामी समर्थ कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कपाळे, इंदिरा गांधी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे यांच्यासह मोठ्या संख्येने पालक वर्ग, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# बावची विद्यालय व वसंतराव शंकरराव काळे कनिष्ठ महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१७ जानेवारी -**

परंडा येथील बावची विद्यालय व वसंतराव शंकरराव काळे कनिष्ठ महाविद्यालय मध्ये शासनाच्या सूचनांनुसार दि.१७ जानेवारी रोजी माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. शासनाने शाळा व महाविद्यालय स्तरावर माजी विद्यार्थी संघ स्थापन करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी मेळावे आयोजित करण्याचे निर्देश दिले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे प्राचार्य नारायण खैरे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये वजीद पठाण, सचिन मोरे, प्रमोद डोके, विकास वाघमारे, शुभम रोडगे, प्रभाकर मिरगणे, दत्तात्रय थोरात यांच्यासह विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व



शिक्षकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य नारायण खैरे यांनी शासनाच्या धोरणांची माहिती देत माजी विद्यार्थी संघाची भूमिका स्पष्ट केली.

शिक्षणासोबतच शिस्त, संस्कार, परिश्रम, सामाजिक बांधिलकी आणि शाळेबद्दल कृतज्ञतेची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रगतीसाठी सर्वतोपरी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी विकास वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना करिअर, स्पर्धा परीक्षा, व्यक्तिमत्त्व विकास व मूल्यशिक्षण याबाबत मौल्यवान मार्गदर्शन केले. माजी विद्यार्थ्यांमधून अजिक्य कोळगे, सुजित रोडगे व प्रविण गायकवाड यांनी शाळेतील आठवणींना उजाळा दिला व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी संदेश दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धोंडीराम दुधे यांनी शिस्तबद्ध पद्धतीने केले. प्रस्तावना संजय वलेकर यांनी करताना माजी विद्यार्थी संघाचे महत्त्व स्पष्ट केले.

नागनाथ काळदाते यांनी कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवर, माजी विद्यार्थी, शिक्षकवर्ग व विद्यार्थ्यांचे आभार मानून सांगता केली.

या मेळाव्यामुळे माजी व सध्याच्या विद्यार्थ्यांमध्ये संवाद, एकोपा व आपुलकी निर्माण झाली असून, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व प्रेरणा वाढल्याचे उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# ‘हिंद-दी-चादर’ जागतिक पातळीवरील ऐतिहासिक सोहळा ठरावा : विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

**जिमाका वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ जानेवारी-**

नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी आयोजित करण्यात येणारा हिंद-दी-चादर हा कार्यक्रम केवळ मराठवाडा किंवा महाराष्ट्रापुरता मर्यादित नसून, जागतिक पातळीवर भारताची श्रद्धा, बलिदान आणि मानवी मूल्यांची महान परंपरा अधोरेखित करणारा ऐतिहासिक सोहळा ठरणार आहे. श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आयोजित या भव्य कार्यक्रमाकडे देश-विदेशातील भाविक, संत-महात्मे व मान्यवरांचे लक्ष वेधले जाणार असून, त्यामुळे हा कार्यक्रम जागतिक स्तरावर पोहोचवावा, असे आवाहन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले.



कार्यक्रमाच्या प्रसिद्धी व माध्यम नियोजनाच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, लातूरचे उपसंचालक (माहिती) विवेक खडसे, जिल्हा माहिती अधिकारी प्रमोद धोंगडे, लातूर जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप, हिंगोली जिल्हा माहिती अधिकारी प्रभाकर बारहाते, सहायक संचालक श्याम टरके यांच्यासह माध्यम प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विभागीय आयुक्त पापळकर पुढे म्हणाले की, हा कार्यक्रम प्रत्येक गावागावात, प्रत्येक घरापर्यंत आणि प्रत्येक मुलापर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व माध्यमांनी समन्वयाने व सकारात्मक दृष्टीकोनातून सहकार्य करावे. माध्यमांची भूमिका या ऐतिहासिक कार्यक्रमात अत्यंत महत्त्वाची असून, समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य माध्यमांद्वारे घडू शकते, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी हिंद-दी-चादर अंतर्गत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमासाठी जिल्हा प्रशासनाने केलेल्या सविस्तर नियोजनाची माहिती दिली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माध्यमांनी सेवेच्या भावनेतून सकारात्मक योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

बैठकीदरम्यान माध्यम प्रतिनिधींनी आपली मते मांडली तसेच कार्यक्रमाच्या अनुषंगाने येणाऱ्या अडचणी व सूचनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

## नांदेडमध्ये दिव्यांगाच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ जानेवारी-**

जिल्हा परिषदेच्या दिव्यांग सक्षमिकरण विभागातर्गत जिल्ह्यातील दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दि १९ व २० जानेवारी रोजी आयोजित करण्यात आले असून या संदर्भात जिल्हा दिव्यांग सक्षमिकरण अधिकारी अवधूत गंजेवार यांच्या अधिपत्याखाली जिल्ह्यातील दिव्यांग शाळेच्या सर्व मुख्याध्यापकांसह व्यवस्थापकीय अधीक्षक व समिती प्रमुखांनी या क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाची जय्यत तयारी केली आहे.



३ डिसेंबर जागतिक अपंग दिनाचे औचित्य साधून दरवर्षी दिव्यांगाच्या शाळेतील विदयार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा यासाठी जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम जिल्हा दिव्यांग विभागामार्फत घेण्यात येतात.दिनांक १९ जानेवारी रोजी दिव्यांगाच्या क्रीडा स्पर्धा सायन्स कॉलेज नांदेडच्या मैदानात होणार आहेत. तसेच दिनांक २० जानेवारी रोजी शंकरराव चव्हाण सभागृह नांदेड येथे सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी राहुल कर्डीले हे उपस्थित राहणार आहेत. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते या स्पर्धेचे उदघाटन होणार आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार,मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, डि. आर. डि. ए. चे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, जि. प. (योजना)शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे,प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग लातूर अविनाश देवसटवार, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार,अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. संदिप माळोदे,उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा राजकुमार मुक्कावार,जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव शरद देशपांडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिवप्रकाश चन्ना,

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग नांदेड शिवानंद मिनगिरे,सायन्स कॉलेज चे प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे, जि. प.माध्यमिकचे शिक्षणाधिकारी माधव सलगर, जि. प. प्राथमिक चे शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, राजस्थानी एज्यू. सोसायटीचे अध्यक्ष ओमप्रकाश गिल्डा यांची प्रमुखउपस्थिती राहणार आहे.

या स्पर्धेत व सांस्कृतिक कार्यक्रमात दिव्यांगाच्या अस्थिव्यंग, मूकबधिर, मतिमंद, अंध या प्रकारातील जवळपास ८५० मुले व मुली सहभागी होणार आहेत. या दिव्यांग विदयार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून विविध समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.जिल्हा दिव्यांग सक्षमिकरण अधिकारी अवधूत गंजेवार यांनी सर्व मुख्याध्यापक, व्यवस्थापकीय अधीक्षक, विविध समित्याचे प्रमुख व सदस्य यांच्या उपस्थितीत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था, भोजन व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, मैदानाची व्यवस्था, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन यासह विविध समित्या स्थापन केल्या आहेत. सहाय्यक सल्लगार दिनकर नाठे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक,सर्व समिती प्रमुख व सदस्य हे हि स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेत आहेत.

## मरवाळी तांडा आश्रम शाळेत तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांना प्रतिसाद

**नायगाव**-इतर मागास बहुजन कल्याण विभाग, नांदेड अंतर्गत नायगाव तालुक्यातील मरवाळी तांडा येथील बालक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक आश्रम शाळेत एक दिवसीय तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा प्रचंड आणि उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सामाजिक न्याय विभागा च्या मार्गदर्शक सूचनेनुसार विमुक्त जाती व भटक्या जमातीतील विद्यार्थ्यांच्या सुप्त क्रीडागुणांना वाव मिळावा, त्यांच्यात खेळाची आवड निर्माण व्हावी, आरोग्य सुदृढ राहावे तसेच शारीरिक व बौद्धिक विकास व्हावा या उद्देशाने दि. १७ जानेवारी रोजी शनिवारी या क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेचे प्राचार्य विजय कुमार देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष रतन लक्ष्मण राठोड हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून गडगा केंद्राचे केंद्रप्रमुख कपिल गारटे, सेवानिवृत्त प्राचार्य किशन रतन राठोड,पी. के.पाटील,मोरे सर, आनंद राव नकाते, महादवाड सर आदी मान्यवर उपस्थित होते. सांस्कृतिक विभागाचे संगीतशिक्षक माधव वाघमारे व त्यांच्या संचाने सादर केलेल्या स्वागतगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वती व कै. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले.यावेळी प्राचार्य विजय कुमार देशमुख यांच्या हस्ते संस्थापक अध्यक्ष रतन राठोड यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्त प्राचार्य किशन राठोड यांचा सत्कार प्रा. हेमंत बावणे यांनी केला. प्रहार संघटनेचे जिल्हाध्यक्ष आनंदराव नकाते यांचा सत्कार आनंदराव सूर्यवंशी यांनी केला, तर महादवाड सरांचा यांचा सत्कार सूर्यकांत जाधव यांनी केला. प्रास्ताविकात प्राचार्य विजय कुमार देशमुख यांनी सांगितले की, या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत आठ आश्रम शाळांतील १४, व १७ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यां चे व्हॉलीबॉल, कबड्डी व खो-खो या सांघिक खेळां मध्ये एकूण ४७ संघांनी सहभाग घेतला आहे. सर्व खेळाडूंनी आपली क्रीडा वृत्ती जपत, सांघिक भावना जोपासत उत्तम खेळाचे प्रदर्शन करावे व यशाची शिखरे गाठावीत, असे मार्गदर्शन त्यांनी केले. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी बालक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक आश्रम शाळेतील सर्व शिक्षकवृंद, पोस्ट बेसिक ज्युनिअर कॉलेज व उच्च माध्यमिक ज्युनिअर कॉलेजमधील प्राध्यापकवर्ग तसेच चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## शाळा व्यवस्थापण समितीची निवड

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. १८ जानेवारी-**

सावरकरनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दिनांक १७ रोजी शाळा व्यवस्थापन समितीची निवड करण्यात आली अध्यक्ष शुभांगी सूर्यकांत वाघमारे ,तर उपाध्यक्ष सचिन अरुण पुरी , अशी बिनविरोध निवड करण्यात आली .

ईस्लापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सावरकरनगर येथे शाळा व्यवस्थापन समिती ची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली .त्यामध्ये अध्यक्ष म्हणून शुभांगी सूर्यकांत वाघमारे तर उपाध्यक्ष म्हणून सचिन अरुण पुरी, अशी निवड करण्यात आली त्यावेळी मुख्याध्यापक अरुण पळसपुरे, सह शिक्षक राजेंद्र देवकते, पालक जगदीश हनवते, प्रमोद जाधव, विकास माहुरकर, नागरगोजे,साहेबराव पळसपुरे, गणेश मामीडवार, उपस्थित होते.

## रामतीर्थ पोलिसांची धडक कारवाई; गोवंशमास वाहतूक करणारा चालक अटकेत, चार लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. १८ जानेवारी-**

रामतीर्थ पोलीस ठाणे हद्दीत गोवंश संरक्षण कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या वाहनावर पोलिसांनी धडक कारवाई करत गोवंशमास वाहतूक करणाऱ्या चालकाला अटक केली. या कारवाईत सुमारे ३ लाख ७० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, या प्रकरणी रामतीर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती सपोनि विक्रम हराळे यांनी दिली.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. १७ जानेवारी रोजी दुपारी १२.३० वाजता नांदेडहैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावरील केरूर ते आदमपूर फाटा दरम्यान, बिलोली तालुक्यातील आदमपूर शिवारात ही कारवाई करण्यात आली. आरोपी



अब्बास महेमूद खुरेशी (वय ४६, रा. इस्लामपुरा, इतवारा, नांदेड) हा त्याच्या ताब्यातील पिकअप वाहन (एमएच २६ बीई ३७४२) मधून गोवंशीय मास विक्रीच्या उद्देशाने हैद्राबादकडे वाहतूक करीत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती.

त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून वाहनाची तपासणी केली असता, पांढऱ्या रंगाच्या पोत्यांमध्ये अंदाजे ३५० किलो गोवंशीय मास आढळून आले. सदर मासाची किंमत प्रतिकिलो २०० रुपये प्रमाणे सुमारे ७० हजार रुपये इतकी असून, सुमारे ३ लाख रुपये किमतीचे पिकअप वाहनही जप्त करण्यात आले. एकूण ३ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

या प्रकरणी पोलीस कर्मचारी प्रकाश गोरखनाथ बेळीकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ अंतर्गत कलम ५ (क) व ९ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई सपोनि विक्रम हराळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, पुढील तपास पोहेका सूर्यवंशी करीत आहेत.

रामतीर्थ पोलिसांच्या या ठोस कारवाईमुळे अवैध गोवंशमास वाहतुकीवर आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## मोफत सर्व रोग निदान व उपचार शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १८ जानेवारी-**

हदगाव तालुक्यातील मनाठा येथे आज दिनांक १८ जानेवारी रोजी मोफत सर्व रोग निदान व उपचार शिबिराचे आयोजन आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या नेतृत्वात तर दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था संचालित आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी मेघे यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित करण्यात आले होते त्यात आज एकूण ८८७ रुग्णांनी विविध आजारांसाठी तपासणी करून घेतल्याची माहिती कळविण्यात आली. त्यापैकी गंभीर आजार व पुढील शस्त्रक्रियेसाठी एकूण २३७ रुग्णांना पुढील उपचाराकरीता पाठविण्यात येणार असल्याची माहिती देखील कळविण्यात आली.

यावेळी नेत्रतज्ञ, अस्थिरोग तज्ञ, श्वासन रोग तज्ञ, मेडिसिन तज्ञ, सर्जरी तज्ञ, कान नाक घसा तज्ञ, बालरोग तज्ञ, स्त्री रोग तज्ञ, त्वचारोग तज्ञ , मुख रोग तज्ञ यांनी या शिबिरास आलेल्या नागरिकांची तपासणी व पुढील उपचारासाठी योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी गंगाधर पाटील चाभरेकर, संभाराव लांडगे, सुदर्शन पाटील जाधव, बाबुसराव काळे,स्वीय सहाय्यक बबन कदम, जयदीप राव जाधव आदी उपस्थित होते.

## शारीरिक तंदुरुस्तीसाठी खेळ आवश्यकच : माजी आ. जवळगावकर

**तभा वृतसेवा**
**हदगाव , दि. १८ जानेवारी-**

भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या तीर्थक्षेत्र कवाना (ता. हदगाव) येथे श्री संत नंदी महाराज यांच्या १०५ व्या पुण्यतिथीनिमित्त विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडले. यात्रेनिमित्त भजन, लेझीम स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक कार्यकर्ते संदीप पवार व मित्र मंडळी यांच्या पुढाकारातून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेने यात्रेचा उत्साहात समारोप झाला. कबड्डी स्पर्धेचे पहिले बक्षीस माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी बोलताना त्यांनी आरोग्य हीच खरी संपत्ती असून,



सध्याच्या काळात तरुण वर्गात वाढत असलेली व्यसनाधीनता चिंताजनक आहे. शारीरिक व मानसिक आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी खेळ अत्यंत आवश्यक आहेत, असे प्रतिपादन केले.

यावेळी संस्थान समितीचे पदाधिकारी, माजी जिल्हा परिषद सदस्य दिगांबर साखरे, माजी पंचायत समिती सदस्य गुलाबराव हाके, विलासराव मस्के पळसेकर, अनिल पवार करमोडीकर, पंजाब पाटील खैरगाव, आनंदराव मस्के, बंडू महाराज, बाळासाहेब वाकोडे, हेरे साहेब, सरपंच भिकाजी सूर्यवंशी, माजी सरपंच साहेबराव पाटोदे, नंदकुमार आसोले, गंगाधर चेपुरवार, रामराम मिराशे, दशरथ राठोड, शंकर सेटे, भारत कपसे, मारोती चेपुरवार, प्रदीप राठोड, रंगराव प्रधान, शांतवन प्रधान, दीपक सूर्यवंशी, कैलास आडे, मदन राठोड, डॉ. महेंद्र प्रधान, सतीश महाराज, सतीश आगरमोरे, बाळू फुले, विलास महाराज यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, युवक मंडळी व पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सादुलवार सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन आयोजक संदीप पवार कवानकर यांनी मानले.

## थकित घरकुल व सिंचन विहीर बिले तात्काळ द्या; अन्यथा अमरण उपोषण

**माहूर** -पंचायत समिती किनवट अंतर्गत येणाऱ्या बहुतांश वाडी, तांडे व वस्त्यांमधील घरकुल लाभार्थी तसेच शेतकऱ्यांच्या सिंचन विहिरींची बिले दीर्घकाळापासून थकित असल्याने लाभार्थ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ही सर्व थकित बिले तात्काळ अदा करण्यात यावीत, अन्यथा २६ जानेवारी २०२६ रोजी पंचायत समिती कार्यालय, किनवट समोर लाभार्थ्यांसह अमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा युवा कार्यकर्ता तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आशिष केवलसिंग नाईक यांनी दिला आहे. यासंदर्भात त्यांनी पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी जयश्री वाघमारे यांना लेखी निवेदन दिले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अनेक घरकुल लाभार्थ्यांची कामे पूर्ण होऊनही सहाय्यक अभियंत्यांकडून कामांचे फोटो शासकीय पोर्टलवर अपलोड करण्यात येत नाहीत. जोपर्यंत लाभार्थी वैयक्तिकरित्या अभियंत्यांना कार्यालयात भेटत नाहीत, तोपर्यंत फोटो अपलोड न झाल्याने ऑपरेटरला एफ.टी.ओ. तयार करून बिले शासनाकडे सादर करणे शक्य होत नाही. यामुळे लाभार्थ्यांना मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच सिंचन विहीर व महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत अनेक वैयक्तिक व सार्वजनिक कामांचे मस्टर सुरू नसल्याने कामे ठप्प आहेत. ही मस्टर तात्काळ सुरू करून कामांना गती द्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. घरकुल लाभार्थ्यांचे भोगवटाधारक प्रश्न प्रलंबित असल्याने बिले निघण्यात अडथळे येत असल्याचेही निवेदनात नमूद आहे. वरील सर्व प्रश्नांची तात्काळ दखल घेऊन प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच २५ जानेवारी २०२६ पर्यंत मार्ग न लागल्यास, २६ जानेवारी रोजी पंचायत समिती कार्यालयासमोर लाभार्थ्यांसह अमरण उपोषण करण्यात येईल, असा ठाम इशारा आशिष नाईक यांनी दिला आहे.

## एसबीआय बँकेत रोकड टंचाई





**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. १८ जानेवारी-**

शहरातील एसबीआय शाखा बँकेत मागील काही दिवसांपासुन शाखा अधिकारी यांच्या नियोजनशुन्य कारभार आणि ढिसाळपणामुळे ग्राहकांना रोकड मिळत नाही. शहरातील एकमेव एटीएम असुन,रोकड अभावी आठ दिवसांपासून एटीएम सेवा बंद आहे. त्यामुळे शेतकरी,व्यापारी,कर्मचारी व व्यावसायीकांना रिकाम्या हाताने जावे लागत आहे.

मोठ्या रक्कम मिळण्यासाठी एक-दोन तास ग्राहकांना ताटकळत थांबून पैसे मिळत नसल्याने ग्राहकांना वापस जावे लागत आहे.ग्राहकांची संख्या लक्षात घेऊन दोन काउंटर सुरु करण्याची ग्राहकांची मागणी जुनीआहे.


शाखा अधिकारी यांच्या नियोजनशुन्य कारभारामुळे एटीएम सेवा बंद असल्याने ग्राहकांना बाहेरच्या खासगी ग्राहक सेवा केंद्राकडून हजार रुपयांसाठी दहा रुपये,या प्रमाणे आगाऊ रक्कम देऊन पैसे काढावे लागतात. त्यामुळे ग्राहकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होतआहे. भारतीय स्टेट बँकेच्या वरिष्ठ संचालक पथकाने या ठिकाणी येऊन खातेनिहाय चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.



नांदेड- माजी मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण यांनी आपल्या सहकाऱ्यांसह श्री श्री श्री १००८ भीमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामीजी केदार जगद्‌गुरु यांचे नांदेड येथे दर्शन घेतले.

## डॉ. सूरज पाटील यांचे एम.डी. (रेडिओलॉजी) मध्ये घवघवीत यश

**नरसी**-नायगाव तालुक्यातील शेळगाव गौरी येथील प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व संभाजी पाटील शेळगावकर यांचे चिरंजीव डॉ. सूरज पाटील यांनी वैद्यकीय क्षेत्रात नवे शिखर गाठत एम.डी. (रेडिओलॉजी) या पदवी



परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळे शेळगाव गौरीसह संपूर्ण नायगाव तालुक्याचा मान उंचावला आहे. प्रो. डॉ. रवी वर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली रेडिओलॉजी विषयात त्यांनी उत्कृष्ट दर्जाचा संशोधन प्रबंध सादर करत एम.डी. (रेडिओलॉजी) ही पदवी यशस्वीरीत्या प्राप्त केली. डॉ. सूरज पाटील यांच्या या घवघवीत यशाबद्दल स्वच्छता दूत माधवराव शेळगावकर, प्रा. डॉ. अशोकराव पवार, लोणीचे सरपंच गजेंद्र लोणीकर, विजय शेळगावकर, राजेंद्र पाटील, शिवाजी पाटील शेळगांवकर, मारोतराव बादवाड नरसीकर यांनी मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील वैद्यकीय सेवेसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. डॉ. सूरज पाटील यांचे हे यश अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत असून ग्रामीण भागातूनही उच्च वैद्यकीय क्षेत्रात यश मिळवता येते, याचे उत्तम उदाहरण त्यांनी घालून दिले आहे.

## भाजपाच्या कार्यकर्त्यांनी खचून न जाता जोमाने कामाला लागावे : एकनाथ पवार

**तभा वृतसेवा**
**लोहा , दि. १८ जानेवारी-**

नांदेड वाघाळा महापालिका निवडणूकीत भरघोष यश मिळाल्या बद्दल भाजपा नेते एकनाथ दादा पवार यांचा भारतीय जनता पार्टी व शहराच्या वतीने यथोचित सत्कार केला.

राज्याचे मुख्यमंत्री देवाभाऊ,राज्याचे महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे,प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली माजी मुख्यमंत्री तथा खा.आशोकराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात भारतीय जनता पक्षाची २९ महानगर पालिकेत युतीची एकहाती सत्ता आली



आहे.भारतीय जनता पार्टी आपल्या पाठीमागे खंबीरपणे उभी आहे.

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये आपली सत्ता येणार काळ्या दगडावरील ...पांढरी रेषा आहे.शहर व ग्रामीण भागातील तरुण कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे , नगर परिषद निवडणुकीत पराभव झालेल्या उमेदवारांनी खचुन न जाता जोमाने कामाला लागावे, देशात व राज्यात भारतीय जनता पक्षाचे सरकार आहे .शहरातील व ग्रामीण भागातील कार्येकर्त्याला कोणतीही अडचण आली तर अर्ध्या राञी मला फोन करा माझे येणे झाले नसेलतर संबंधित विभागाला फोन करुन विचारणा करुन शकतो खरे काय आणी खोटे काय, यात जर सतेता नसेल तर हा भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता आहे आणि सर्वसामान्य नागरिक आहे जास देण्याचे काम बंद करा कोणाचे ऐकुन अन्याय करत आसाल तर संबंधित विभाग प्रमुखाना वरिष्ठाच्या दालनात हाजरी लावतो कार्येकर्त्यांनी खेचुन न जात जोमाने कामाला लागा भारतीय जनता पार्टी आपल्या खंबीरपणे पाठीमागे आहे. आगामी जि.प.निवडणूकीच्या कामाला लागा येणारा काळ आपलाच आहे.

माजी नगरसेवक जिवन पाटील. चव्हाण, युवराज वाघमारे,हांनमत लांडगे यांनी अनेक अडचणींच्या मुद्यावर चर्चा केली तात्काळ संबंधित विभागाच्या प्रमुखांना फोन करुन कार्येकर्त्यांची आडचन सोडवली यावेळी ,पुंडलिक पाटील. बोरगावकर,डी.एन.कांबळे, नगरसेवक नबी सेठ, मिलिंद पाटील. पवार,लोहा संचालक खरेदी विक्री संघाचे सुधाकर सातपुते,पिनु चुडावकर,गजानन कराडे गुंटे,लक्ष्मण कांजले,धिरज हाके, मारोती पंदलवाड,अजित पाटील, निखिल महाबळे, प्रशांत कऱ्हाळे,बाळासाहेब कतुरे,विकास राठोड अनेकांची उपस्थित होती.